
# मेहता मराठी ग्रंथजगत

मे, २०२२
पृष्ठे ६८ किंमत : रु. १५
वर्ष बाविसावे
अंक पाचवा

“शहाजीराजे म्हणजे
पहाडासारखे पिता
आणि जिजाऊसाहेब म्हणजे
भव्य सागरासारखी माता!
या दोघांच्या पुण्याईच्या बळावर
अलम दुनियेला
आम्ही दाखवून देऊ;
सह्याद्रीच्या विक्रमवैराग्यापुढे
हिमालयाची शिखरं किती
ठेंगणी आहेत ते!”



# उदगीर येथे रंगलेल्या
# ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील क्षणचित्रे























# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मे २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक पाचवा

**संपादक**

अखिल मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**संपादन साहाय्य**

पूजा भडांगे

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **प्रकाशन** | १० |
| **हस्तांतरण** | १४ |
| **एक एक पान घडताना...** | १८ |
| **पुस्तक परिचय** | |
| खाकी फाइल्स | २२ |
| कॉर्पोरेट कबीर | २६ |
| स्थलांतर | ३० |
| धर्मवेध | ३४ |
| बोल बच्चन | ३८ |
| एके दिवशी | ४२ |
| अराजक | ४४ |
| बाईची गोष्ट | ४८ |
| आजचा दिवस माझा | ५४ |
| आजादी | ५८ |
| **श्रद्धांजली** | ६० |
| **दिनविशेष** | ६२ |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

## संपादकीय

### उदगीरवासियांचा उदंड उत्साह आणि पुस्तकप्रेमींचा भरघोस प्रतिसाद

अवघ्या ३ महिन्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलानाचं बिगुल वाजलं आणि ९५ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यावेळी उदगीर, लातूर इथं मोठ्या उत्साहात पार पडलं. नाशिकच्या संमेलनानंतर अत्यंत कमी कालावधी असतानाही उदगीरकरांनी निभावलेलं यजमानपद अत्यंत कौतुकास्पद होतं.

गेल्या संमेलनात मेहता पब्लिशिंग हाऊसचे दिवंगत संपादक श्री. सुनील मेहता यांच्या कल्पनेतून 'साहित्योत्सव' हा अत्यंत अभिनव उपक्रम मेहता प्रकाशनाकडून राबवण्यात आला होता. यावेळी संमेलनाचं सगळं नियोजन करताना सुनील मेहतांची पदोपदी आठवण आली नसती तर नवलच! संमेलनातून केवळ ग्रंथविक्री करणं वा ग्रंथ प्रदर्शन करणं इतकचं आपल्या प्रकाशन संस्थेचं काम नसून लेखक-वाचकांचा संवाद घडवून आणण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील असतो. त्यामुळेच संमेलनातील पुस्तक दालनात विविध

मान्यवरांचे परिसंवाद, चर्चा, मुलाखती, नव्या पुस्तकाचं प्रकाशन असे विविध कार्यक्रम आयोजित केले होते. या सगळ्या स्मृतींची आठवण आणि सुनील मेहतांची शिकवण या दोन्ही गोष्टींचा मेळ साधत आम्हीही यावेळी एक पाऊल पुढे टाकलं. संमेलनाच्या तिन्ही दिवशी सुनील मेहतांच्या स्मृतीप्रित्यर्थ विविध सेवाभावी संस्थांना ग्रंथभेट देऊन गौरवण्यात आलं. दि. २२ एप्रिल रोजी सुप्रसिद्ध लेखिका सोनाली नवांगुळ यांच्या हस्ते बाळासाहेब दीक्षित, 'ज्ञानसाधना प्रतिष्ठान लातूर', दि. २३ एप्रिल रोजी ज्ञानपीठ विजेते कोंकणी लेखक दामोदर मावजो आणि प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील यांच्या हस्ते 'माझं लातूर' आणि शेवटच्या दिवशी 'उपरा'कार लक्ष्मण माने यांच्या हस्ते 'SOS बालग्राम' या तीन संस्थांचा ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला.

या संमेलनकाळात दोन महत्त्वाचे प्रकाशन सोहळे देखील आपल्या पुस्तक दालनात आयोजित केले होते. ज्यामध्ये 'उपरा'कार प्रसिद्ध लेखक लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' आणि 'किटाळ' या दोन्ही पुस्तकांच्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन करून इथून पुढे लक्ष्मण माने यांच्या साहित्याला मेहता प्रकाशनाचं नवं घर मिळाल्याचीही घोषणा करण्यात आली. यासोबतच प्रसिद्ध बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या 'खळाळता अवखळ झरा' याही पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं. साहित्य संमेलनात असंख्य साहित्य रसिकांच्या साक्षीने, पुस्तक दालनात प्रकाशन सोहळा करणं ही आमच्यासाठी कायमच आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट असते. या दोन्ही कार्यक्रमांसोबतच महाकादंबरीकार विश्वास पाटील यांची आगामी कादंबरीमाला 'महासम्राट' मधील पहिला खंड 'झंझावात' या खंडाचा प्री-बुकिंगचा सोहळा देखील आयोजित केला गेला होता. या कार्यक्रमालासुद्धा अनेक मान्यवर, उदगीरमधील शालेय विद्यार्थी आणि साहित्य रसिक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर लेखक विश्वास पाटील आणि शालेय विद्यार्थी यांच्यासोबतचा गप्पाटप्पांचा कार्यक्रमसुद्धा अधिक रंगला होता.

डोक्यावर रणरणतं ऊन असलं तरी विविध पुस्तक दालनांना भेट देऊन आपल्याला हवं ते पुस्तक मिळाल्याचा, आपले लाडके लेखक भेटल्याचा आनंद चेहऱ्यावर घेऊन संमेलनात वावरणारे चेहरे पाहिले की उन्हाची तलखी आपोआप कमी व्हायची. या तीनही दिवसात आपल्या पुस्तक दालनात अनेक मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली. उदगीरसारख्या बहुभाषिक भागात घडवून आणलेल्या या साहित्य संमेलनात पुस्तक दालनात होणारी वाचकांची, साहित्य रसिकांची अलोट गर्दी ही उन्हातही सुखावणारी होती.

हे तीनही दिवस पुस्तक दालनाला योग्य ते सहकार्य करण्यासाठी आयोजक, समस्त उदगीरकर आणि उपस्थित सर्व साहित्यरसिकांचे मनापासून आभार.

साहित्य संमेलनात शेकडो पुस्तकांची विक्री झाली आणि अजूनही नवीन पुस्तकांची निर्मिती मेहता पब्लिशिंग हाऊसकडून होतच आहे. विविध विषयांवरील पुस्तकांसोबतच या उन्हाळी सुट्टीत आम्ही बालसाहित्यातील चार नवी कोरी पुस्तकं आपल्या छोट्या दोस्तांसाठी भेट म्हणून घेऊन आलो आहोत. आशा आहे की, त्यांची ही सुट्टी धमाल, मजा मस्तीसोबतच पुस्तकांच्या सानिध्यात नव्या दुनियेची सफर घडवणारीही जावो...



# मेहता मराठी ग्रंथजगत

## नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

# मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon    GET IT ON Google Play    Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!


इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

## एकनाथ आव्हाड यांच्या 'खळाळता अवखळ झरा' चे साहित्य संमेलनात प्रकाशन




प्रसिद्ध बाल साहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या 'खळाळता अवखळ झरा' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच पार पडले. उदगीर येथे झालेल्या ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी अर्थात दि. २३ एप्रिल २०२२ रोजी सकाळी ११ वाजता, मेहता प्रकाशनाच्या पुस्तक दालनात हा प्रकाशन सोहळा पार पडला. अवखळ शब्दकळा आणि मुलांना गुंतवून ठेवणारं कथानक, अशी जुगलबंदी साधणारे बाल साहित्यिक म्हणून एकनाथ आव्हाड मराठी बाल साहित्यात परिचित आहेत. 'खळाळता अवखळ झरा' हे त्यांचे तिसावे




पुस्तक असून या पुस्तक प्रकाशनाला ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कोंकणी लेखक दामोदर मावजो, ‘संभाजी’कार विश्वास पाटील, मेहता प्रकाशनाचे अखिल मेहता आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## ‘उपरा’कार लक्ष्मण माने यांच्या पुस्तकांना मिळालं मेहता प्रकाशनाचं नवं घर, साहित्य संमेलनात झालं पुस्तकांच्या सुधारित आवृत्तींचं प्रकाशन









'उपरा'कार लक्ष्मण माने म्हणजे परिवर्तनवादी व पुरोगामी विचारांची ज्वलंत लेखणी. भारतातील मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या लक्ष्मण माने यांनी समाजातील वंचित आणि उपेक्षित जनतेचा आवाज आपल्या लेखणीतून वेळोवेळी व्यक्त केलाय. त्यांच्या 'उपरा' या आत्मकथनाला १९८१ साली साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला असून भारतातील बहुतांशी भाषांमध्ये या पुस्तकाचा अनुवाद झालाय. त्याचप्रमाणे 'किटाळ' या पुस्तकातून लेखकाच्या सामाजिक आणि वैयक्तिक कार्याला उद्ध्वस्त करू पाहणाऱ्या कटाची, किटाळाची आणि किटाळमुक्तीची कहाणी मांडली गेलीय. या दोन्ही प्रसिद्ध पुस्तकांच्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन २४ एप्रिल २०२२ रोजी ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात पार पडलं. यावेळी लेखक लक्ष्मण माने, मेहता प्रकाशनाचे अखिल मेहता आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

'उपरा' या आत्मकथनाची पहिली आवृत्ती प्रकाशित होऊन तीस वर्षे लोटली. पण अजूनही उपराची जादू कायम आहे. वाचकांच्या तीन पिढ्यांनी उपरावर आजवर अतोनात प्रेम केलं आहे. गेली चार दशकं सातत्याने वंचितांच्या जगण्यावर भाष्य करणाऱ्या लक्ष्मण मानेंची सर्व साहित्यसंपदा इथून पुढे मेहता प्रकाशनामार्फत नव्या स्वरूपात प्रकाशित केली जाऊन

वाचकांसाठी सज्ज होणार आहे. ‘उपरा’ आणि ‘किटाळ’सह ‘उद्‌ध्वस्त’, ‘भटक्याचं भारुड’, ‘क्रांतिपथ’, ‘बंद दरवाजा’, ‘पालावरचं जग’, ‘का कराचं शिकून?’, ‘खेळ साडेतीन टक्क्यांचा’, ‘रेशेपलीकडील लक्ष्मण’, ‘प्रकाशपुत्र’ आणि ‘यशवंतराव चव्हाण : आख्यायिका आठवणी’ अशी एकूण १३ पुस्तके नव्या आवृत्तीसह प्रकाशित होण्यासाठी सज्ज झाली असून लवकरच ती वाचकांसाठी उपलब्ध करून दिली जातील.

या कार्यक्रमात मेहता पब्लिशिंग हाऊसचे दिवंगत संचालक सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एसओएस या संस्थेस लक्ष्मण माने यांच्या हस्ते दहा हजार रुपयांची पुस्तके भेट देण्यात आली.

**नवी संहिता... नवा आशय...**




# हिमालयारण्यक

**स्टीफन ऑल्टर**

अनुवाद

**आश्लेषा गोरे**

हिमालयाच्या कोणत्या ना कोणत्या पैलूंबद्दल शेकडो पुस्तकं आहेत, त्यातले काही मास्टरपीस आहेत. तरीही त्या पहाडांच्या अद्‌भुत व्यामिश्रतेला आणि वैभवाला इतक्या जवळून स्पर्श करू पाहणारं, या पुस्तकाइतकं आत्तापर्यंत तरी दुसरं काही नसेल. (बरंचसं आयुष्य इथल्या पहाडात घालवल्यामुळे) स्वत:ला स्थानिक प्रजाती मानणारे स्टीफन ऑल्टर पृथ्वीवरच्या सर्वांत मोठ्या पर्वतरांगेचा निश्चित असा नैसर्गिक इतिहास ‘हिमालयारण्यक’ (Wild Himalaya) मधून आपल्यासमोर मांडतात.

**किंमत : ६५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## हस्तलिखित हस्तांतरण सोहळा...

मायमराठीच्या साहित्यदरबारात विश्वास पाटील यांच्या 'महासम्राट' या कादंबरीमालेची मुहूर्तमेढ रोवली जात आहे. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुलखावेगळ्या जीवनगाथेला आपल्या शब्दशिल्पाद्वारे आकार देणारे लेखक विश्वास पाटील गेल्या कित्येक वर्षांच्या सखोल अभ्यासानंतर ही कादंबरीमाला वाचकांच्या भेटीस घेऊन येत आहेत. श्री. पाटील यांनी शिवरायांचा इतिहास जाणून घेण्यासाठी महाराष्ट्रातील २४० किल्ल्यांना प्रत्यक्ष भेटी दिलेल्या असून गेली ३० वर्षे ते यावर संशोधन करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासातील औरंगजेब, शहाजहान, शहाजी राजे रुस्तम-ए-जमाल यासारखे अनेक दाखले देताना 'शिवराय हा अत्यंत जबाबदारीने लिहिण्याचा विषय आहे.' असे मत विश्वास पाटील मांडून छत्रपती शिवराय, जिजाबाई आणि शहाजीराजे या तिघांच्या नात्यातला रेशमी बंध या निमित्ताने अभ्यासायला मिळणे हे या कादंबरी लिखाणाचे फलित आहे असेही ते म्हणतात.

धाडसी योद्धे आणि युगपुरुष इतिहास निर्माण करतात, तर कवी, नाटककार आणि साहित्यिक त्यांच्या मुलखा वेगळ्या जीवनगाथेला आपल्या शब्दशिल्पाद्वारे आकार देतात. छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्रात आकाराने छोटंसं हिंदवी स्वराज्य निर्माण केलं; परंतु त्यांच्या




काळापासूनच त्यांनी आपल्या महान कर्तृत्वाने जगभरातील स्वातंत्र्यप्रेमी जनतेच्या हृदयावर एखाद्या महासम्राटासारखं राज्य केलं आहे.

या कादंबरीमालिकेचा पहिला खंड झंझावातच्या हस्तलिखिताचा हस्तांतरण सोहळा माजी संमेलनाध्यक्ष श्रीपाल सबनीस, लेखक विश्वास पाटील, मसाप पुणेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, दैनिक सकाळचे संपादक सम्राट फडणीस यांच्या उपस्थितीत मेहता पब्लिशिंग हाऊसच्या कार्यालयात पार पडला.


'इतिहास म्हणजे केवळ सनावळी, युद्ध, पराभव आणि घटनाप्रसंगाची जंत्री नसून हे ते त्या राष्ट्राचं संचित असतं; आणि या इतिहासालाच साक्षी ठेऊन वर्तमानाचा विचार करून भविष्याचा वेध घेणारे साहित्यिक विश्वास पाटील म्हणजे मराठी साहित्यातील प्रतिभेचं उत्तुंग शिखर आहे. त्यामुळे ही कादंबरीदेखील विश्वास पाटील यांच्या साहित्य वाटचालीतील मैलाचा दगड आणि मानाचा तुरा ठरणार आहे.' असे मत मसाप, पुणेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले.

इतिहास आणि वर्तमान अशा दोन्ही काळाला भिडणारी सामर्थ्यवान लेखणी विश्वास पाटील यांना लाभल्यामुळे ऐतिहासिक विषयांवर त्यांनी केलेले लेखन नेहमीच वाचकांच्या पसंतीस उतरत आले आहे. दै. सकाळ




पुणेचे मुख्य संपादक सम्राट फडणीस यांनी आपले मनोगत व्यक्त करताना ‘शिवरायांना दैवतीकरणात न अडकवून ठेवता सामान्य माणसांच्या मनातली प्रतिमा ठेवणारा, राजकीयदृष्ट्या चिकित्सा करणारा हा ग्रंथ वाचक आणि समीक्षकांच्या पसंतीस निश्चितच उतरेल असे मत मांडले. ‘महासम्राट’ कादंबरीच्या निमित्ताने पुन्हा एकदा प्रामाणिक, वास्तववादी आणि कुठल्याही परिप्रेक्ष्यात न अडकता केलेल्या ऐतिहासिक लिखाणाचं एक उत्तम उदाहरण ‘महासम्राट’ या कादंबरीमालेतून वाचायला मिळणार आहे.

या कार्यक्रमाला प्रेक्षकांची मोठी उपस्थिती लाभली असून आचार्य अत्रे प्रतिष्ठानतर्फे बाबुराव कानडे यांनी लेखक विश्वास पाटील आणि मेहता प्रकाशनाचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता यांचा सत्कार केला. यावेळी अनिल तळेकर आणि प्राध्यापक दिगंबर ढोकळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कादंबरीमालेच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन ऑगस्ट मध्ये होणार असून त्याचवेळी हिंदीतसुद्धा ही कादंबरीमाला वाचकांच्या भेटीस येत आहे.


महासम्राट
विश्वास पाटील
खंड पहिला
झंझावात
छत्रपती शिवरायांच्या जीवनावरील कादंबरीमाला
महाकादंबरीकार विश्वास पाटील यांच्या लेखणीतून उतरलेली, २४० किल्ले फिरून, ३० वर्षांच्या संशोधनातून साकारलेली शिवरायांच्या जीवनावरील कादंबरीमाला.
प्रकाशन पूर्व नोंदणी
किंमत ₹५७५
सवलतीत ₹४२५ फक्त (पोस्टेज-₹४०)
पृष्ठसंख्या ४५०
प्रकाशन दिनांक १ ऑगस्ट, २०२२
मेहता पब्लिशिंग हाऊस
मेहता बुक सेलर्स
www.mehtapublishinghouse.com
सर्व प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध
आपली प्रत आजच नोंदवा
९४२०५९४६६५
G Pay

## एक एक पान घडताना...

**–अनिल मेहता**



*सुनील मेहतांवर पुण्यातल्या मेहता पब्लिशिंग हाऊसची सगळी जबाबदारी सोपवल्यानंतर कोल्हापुरातील ‘मेहता बुक सेलर्स’ नव्याने उभं करणं हे मोठं आव्हान होतं. अनिल मेहतांनी कोल्हापुरातली ही घोडदौड कशी सुरु ठेवली हे जाणून घेऊया या विशेष लेखात...*

### ९.
### मेहता बुक सेलर्स

१९८९ च्या आसपास एक महत्त्वाची घटना कोल्हापुरात घडली. माझे दोन लहान भाऊ उल्हास आणि प्रदीप पूर्वीपासूनच कोल्हापूरच्या दुकानात काम पाहत होते. प्रत्येकाचा वंशवृक्ष स्वतंत्रपणे वाढत होता. अशा वेळी मतभेद होण्याच्या व वाढण्याच्या अगोदरच स्वतंत्रपणे संसार थाटून, त्याचबरोबर उद्योगही स्वतंत्र करण्याची गरज असते. ज्याची त्याची जबाबदारी ज्यानं त्यानं वेळीच सांभाळली, तर प्रत्येकाला प्रस्थापित होण्यास मदत होते. म्हणून आम्ही चारही बंधू वाटण्या करून स्वतंत्र झालो.

माझ्या वाट्याला मी पुण्याला उभं केलेलं ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ आलं. त्यामुळं आता

त्यावरच लक्ष केंद्रित करणं भाग होतं.

पण मी मुळात पुस्तक विक्रीचा व्यवसाय करणारा म्हणून गेली पंचवीस वर्षं कोल्हापुरात प्रसिद्ध होतो. मीच घरात सर्वांत मोठा भाऊ असल्यानं व कोल्हापुरात येऊन 'अजब पुस्तकालय' सुरू केलेलं असल्यानं ग्राहकांशी माझा घनिष्ठ संबंध निर्माण झालेला होता. त्याचं कारण म्हणजे माझा बोलका स्वभाव; शिवाय मी कॅशकाऊंटरवर बसायचो. दुकानातील व्यवहार माझ्या जबाबदारीवरच होता. तेव्हा संपूर्णपणे पुण्यातील मेहता पब्लिशिंग हाऊसवरच काम करायचं की त्याबरोबरीनं आपली पुस्तक विक्रीची आवडही जोपासायची? हा माझ्यापुढं मोठा प्रश्न उभा राहिला होता. शेवटी बराच विचार करून मी अजब पुस्तकालयाच्याच शेजारी पुस्तकांच्या गोडाऊनसाठी म्हणून एक जागा घेऊन ठेवलेली होती. ती माझ्या वाट्याला आली होती. तिथं 'मेहता बुक सेलर्स' हे नवीन दुकान सुरू केलं. अजब पुस्तकालयाशी माझा लौकिक अर्थानं संबंध तुटला. आपोआपच 'मेहता बुक सेलर्स' या नव्या दुकानाची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर पडली आणि सुनीलवर पुण्याच्या प्रकाशन संस्थेची संपूर्ण जबाबदारी हळूहळू येत गेली. मात्र मार्गदर्शन करतच होतो.

'मेहता बुक सेलर्स' नव्यानं सुरू केलं खरं. पण त्यावेळी माझ्यासमोर प्रचंड मोठ्या अडचणी उभ्या होत्या. स्टाफ पुरेसा नाही. जागा अत्यंत अपुरी. सर्व पुस्तकं दुकानात ठेवणं अवघड झालं होतं. मग बराचसा पुस्तकांचा साठा घरात असायचा. मातीच्या भिंती. भिंतीला पोपडे आलेले. खराब दिसायचं, माती पडायची म्हणून आम्ही त्याला ड्रॉईंग पेपर चिकटवले. दुकानाच्या माडीवर एक भाडेकरू राहत होता. त्याचाही त्रास होई. पण चार-पाच वर्षांनी सुदैवानं तो भाडेकरू गेला आणि ती पूर्ण जागा माझ्या ताब्यात आली. त्यानंतर मी तिथं नवीन बांधकाम केलं. बिल्डींग बांधण्यात व आतील इंटेरिअर व फर्निचर करण्यात सुनीलचा मित्र आर्किटेक्ट राजेश चव्हाण याची खूप मदत झाली.

पूर्वी मी परदेशात गेलो होतो व तिथली काही पुस्तकांची दुकानं बघितली होती. विशेषतः जर्मनीमधील दुकानं मला खूप आवडली होती. एक मोठं

काचेचं तावदान व दरवाजा आणि लाल विटांचं बांधकाम. माझ्या डोक्यात ते पक्कं होतं. त्याप्रमाणं मी या नव्या दुकानाचं डिझाईन केलं. एक वर्षभर तरी ते बांधकाम सुरू असावं. त्यावेळी सर्व पुस्तकं घरी ठेवली होती. तिथंच आमचा स्टाफ काम करत होता. नेहमीचे गिऱ्हाईक तिथं येऊन पुस्तकांची खरेदी करत. दुकानासमोर एक पानाची टपरी होती, तिथं मी स्टूल ठेवून त्यावर दिवसभर बसून असायचो. तिथंच फोनचं एक कनेक्शन घेतलं होतं. माझी कामंही चालायची व बांधकामाकडं लक्षही रहायचं. पुस्तकांचं हे नवं दुकान मला माझ्या मनासारखंच हवं होतं. आणि तसंच झालं. त्या अगदी छोट्याशा जागेत माझ्या मनातली ती सुंदरशी तीन मजली बिल्डिंग उभी राहिली.

मग स्थिरस्थावर होऊ लागलं. मेहता बुक सेलर्स हे दुकान लोकांना हळूहळू माहिती होत गेलं. ग्रंथालयांच्या ग्रंथपालांनी एकमेकांना सांगून मेहता पब्लिशर्सचं नाव सर्वदूर केलं. महाविद्यालये व शिवाजी विद्यापीठाच्या मोठमोठ्या ऑर्डर्स असत. मी प्रचंड बिझनेस केला. दर दोन - तीन महिन्यानं दिल्लीला जायचो. तिथल्या प्रकाशकांशी माझ्या ओळखी होत्या. कोल्हापुरातील एक चांगला पुस्तक विक्रेता व तो वेळेवर पेमेंट करतो, तर त्याला पुस्तकं द्यायला हरकत नाही. असं माझं नाव झालं होतं. आजही ते आहे. त्यामुळं दिल्लीतून दुकानात पुस्तकं येत.

आता कॉम्प्युटरमुळं, इंटरनेटमुळं, ईमेल्समुळं गोष्टी पूर्वीपेक्षा सोप्या झाल्या आहेत. मुंबईलासुद्धा जाण्याची गरज लागत नाही. कारण पुस्तकांची यादी मेल केली की दुसऱ्या दिवशी पुस्तकं दुकानात येतात. पुस्तकांचे कॅटलॉग्स, पी. डी. एफ. फाईल्स मेलनंच मिळतात. तंत्रज्ञानामुळं फार मोठा फरक पडतो. त्यामुळं नंतर दिल्लीच्या माझ्या वाऱ्या हळूहळू बंद झाल्या.

आजही मला पुस्तक विक्रीमध्ये प्रचंड रस आहे. असे विविध प्रकारचे पुस्तकं ठेवणारा कोल्हापुरात मी एकटाच आहे. याचं कारण असं आहे की, वाचनामुळं मला समजतं, की साधारणपणे कुठलं पुस्तक चांगलं आहे, कुठलं पुस्तक मार्केटमध्ये चालू आहे. त्यामुळं वर्तमानपत्रात माहिती आली की, लोकं माझ्याकडं येतात. इंग्लिश असो, मराठी असो. ते पुस्तक


माझ्याकडं आहे, हे लोकांना हमखास माहीत असतं. नसेल पुस्तक तर मी मागवून देतो. अगदी वेळेत. हेही लोकांना माहीत आहे. काही विद्यार्थ्यांना एखादं पुस्तक अगदी अर्जंट हवं असतं. ते पुस्तक दिल्लीचं असतं व मी ते तीन-चार दिवसांत तत्परतेनं कुरिअरनं मागवून देतो. ती सेवा ताबडतोब देता आल्याचं मला समाधान असतं आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघितला की मला खूप बरं वाटतं. त्यामुळं मला लोकं आजही चांगला पुस्तक विक्रेता म्हणून ओळखतात.

गेली छप्पन वर्षं मी या व्यवसायामध्ये आहे, त्यामुळं अनेक प्राचार्य, अनेक ग्रंथपाल यांच्याशी माझा सबंध आला. त्यावेळचे जे ग्रंथपाल आणि प्राचार्य होते ते स्वतः येऊन पुस्तकं निवडत. आठवड्यातून एकदा दुकानात येत. त्यांच्याकडं आम्ही पुस्तकं पाठवायचो, त्या-त्या विभागातील लोकांना बोलावून ते पुस्तकं दाखवत असत. एखादं महाग असेल तर ते विचारायचे की, या या पुस्तकाची दुसरी कॉपी उपलब्ध आहे का? तर आमच्या दुकानात बहुदा ते असायचेच. आता प्राचार्य लोक फार कमी येतात. ते त्यांच्या प्रशासकीय कामात गुंतलेले असतात. पण फोनवरून बोलणं चालू असतं आणि त्यांना जी काही पुस्तकं हवी असतात ती मी वेळेत पुरवितो.

मला ग्रंथपाल मंडळींचा चांगला अनुभव आला. गडहिंग्लजचे टी. ए. पाटील, न्यू कॉलेजचे पी. सी. पाटील, विवेकानंद कॉलेजचे श्री. मोरे, इस्लामपूरच्या सुनीता शिंदे, कागलच्या जवळकर मॅडम ही मंडळी आजही आठवणीत आहेत. या ग्रंथपालांना पुस्तकांची बऱ्यापैकी माहिती असायची. उत्तम पुस्तकं खरेदी करण्याची आवड होती. माझ्या अनुभवानुसार बरेचसे ग्रंथपाल अतिशय स्वच्छ कारभार करणारे आहेत. पुस्तकं विकत घेतली म्हणून त्यांनी कुठली काही भेटवस्तू मागितली नाही. मला खरोखरच त्याचा आनंद होतो आणि मीही त्याबाबतीत स्पष्ट आहे, की कुठल्याही ग्रंथपालाला या प्रकारची आमिषं दाखवून आपली पुस्तकं विकायची नाही. काही प्रसंगानिमित्त मी स्वखुशीनं एखादा पेन किंवा एखादे पॅड देतो तेवढंच.

(क्रमशः)

## पुस्तक परिचय




# खाकी फाइल्स

**नीरज कुमार**

माजी पोलीस आयुक्त, दिल्ली पोलीस

अनुवाद

**रोहन टिल्लू**

*अंध:कारमय गुन्हेगारी अंतरंग आणि पोलिसी धैर्याची पराकाष्ठा यांचं मिश्रण असणाऱ्या, आयपीएस नीरज कुमार यांच्या कारकिर्दीतल्या अविस्मरणीय घटनांचा मागोवा*

गुन्हेगारी आणि पोलीस तपास कथा हा अनेक वाचकांचा आवडीचा विषय आहे. काही दशकांपूर्वी श्रीकांत सिनकर, व.कृ. जोशी आदी लेखकांनी या विषयावर विपुल लेखन केलं आहे. त्याला वाचक वर्गाचा उदंड प्रतिसाद लाभला. अनेक वेळा गुन्ह्याची उकल करताना पोलिसाची बुद्धिमत्ता आणि धाडस यांचा कस लागतो. या तपासकथा थरार आणि साहसाने ओतप्रोत भरलेल्या असतात.

निर्ढावलेल्या गुन्हेगारांना पकडताना अनेक वेळा जिवावरचे प्रसंग ओढवतात. इंटरनेटच्या मुक्त वापरामुळे तरुण पिढी बेभान होते आहे. त्यातूनच बलात्कार विनयभंगासारख्या गुन्ह्यात बेसुमार वाढ झाली आहे. OTT सारख्या सेन्सॉर विरहित प्लॅटफॉर्ममुळे आंबट शौकिनांच्या बुभुक्षितपणात वाढ होत आहे. सदसद्‌विवेक, शिष्टाचार, सामंजस्य आदी मानवी प्रवृत्ती लोप पावते आहेत. लहानसहान कारणांवरून कोयता, सत्तूरचे हल्ले वादात आहेत. परिणामांची फिकीर न करता क्षणिक भावनांच्या उद्रेकातून हे गुन्हे घडतात. त्यातूनच पोलिसांची आणि न्यायव्यवस्थेची यातायात वाढली आहे.

थोडक्यात पैसा, वासना, वैमनस्य यामुळे गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे.

प्रस्तुत 'खाकी फाइल्स' नीरज कुमार लिखित कथासंग्रहात त्यांच्याच पोलिसी कारकिर्दीतल्या नऊ प्रकरणांचा समावेश आहे. यात दिल्लीतील गाजलेल्या खळबळजनक निर्भया बलात्कार – हत्याकांडाचे प्रकरण विस्ताराने वर्णिले आहे.

नीरज कुमार स्वत: पोलीस अधिकारी होते. त्यांच्याच कारकिर्दीतली ही सर्व प्रकरणं पोलिसांना पाळावी लागतात. प्रसारमाध्यमांचा दबाव, गुन्हेगारांचे राजकीय लागेबांधे आणि त्यांचा हस्तक्षेप, गुन्हा ना दडविण्याचे हातखंडे या सर्वांचा सामना करत पोलिसांचं प्रकरण तडीस न्यावं लागतं. मिडियाची नाराजी, नातेवाइकांची हस्तक्षेप, यांचा अडसर दूर करून ते प्रकरण न्यायालयाधीन करावे लागते. ही प्रक्रिया किती जिकिरीची असते. हे फक्त पोलीस जाणोत.

'उत्कंठा' ही वाचनामागची मूलभूत प्रेरणा असते.

ही जी नऊ प्रकरणं या पुस्तकात लिहिली आहेत, त्यांना पोलीस चातुर्यकथा म्हणता येणार नाही कदाचित. पण एका पोलीस अधिकाऱ्याचं प्रामाणिक आत्मनिवेदन नक्कीच म्हणता येईल.

अत्यंत ओघवत्या भाषेत नीरज यांनी वाचकांसमोर मांडली आहेत. मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद श्री. रोहन टिल्लू यांनी अत्यंत सहजतेनं केला

आहे.

नीरज कुमार यांच्या पहिल्या पुस्तकाचं वाचकांनी स्वागत केलं. याही पुस्तकाचं स्वागत होईल.

अपप्रवृत्तीविरुद्ध पोलिसांचं हे एकप्रकारे युद्धच असते. आणि 'युद्धस्य कथा रम्या:' असं म्हटलेलंच आहे.

**नवी संहिता... नवा आशय...**




# गृहभंग

**डॉ. एस. एल. भैरप्पा**

अनुवाद

**उमा कुलकर्णी**

डॉ.एस.एल. भैरप्पांची भारतातील सर्व भाषांमध्ये अनुवादित व अग्रक्रमाने गणलेली ही कादंबरी.

गंगम्मा रागीट म्हणूनच गावात प्रसिद्ध असते. रामण्णांच्या जाण्यानंतर तर ती आल्या-गेलेल्यांवर सूड उगवते. स्वत:च्या मुलांनाही झोडपणारी, भांडखोर गंगम्मा, नातवंडांनाही प्रेम देत नाही. तर तिची सुशील, संस्कारी सून नंजम्मा मूर्ख नवरा, खाष्ट सासू, अंधश्रद्धाळू शेजार आणि भीषण गरिबी अशी ओढाताण सहन करत परिस्थितीशी झुंज देत आहे.


गंगम्मा व चेन्निंगराय यांच्यात माणुसकीचा अंकुर फुटतो का? 'रामसंद्र' गावातील प्लेगची साथ, सैरभैर झालेलं मानवी जीवन, अज्ञान, नवस, कर्जबाजारीपणा यांतूनही लोक कसे जगतात? प्रकाशाची तिरीप शोधत चाललेले मादेवय्या आणि छोटा विश्व जीवन कधीही थांबत नाही, हे सांगतात... अखंड प्रयत्नवाद शिकवतात.


मानवी मनाच्या अतर्क्य व्यापारांमुळे आणि नियतीच्या घावांमुळे घायाळ झालेल्या नंजम्माची हृदयाला पीळ पाडणारी कादंबरी.


**किंमत : ४९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


**नवी संहिता... नवा आशय...**

## अम्माबरोबरच्या सहली छान छान...
## देखणी चित्रं अन् माहिती मौल्यवान








- अम्मा, चल **तिरुपतीला** जाऊ!
- अम्मा, मला सलीम चिश्तींच्या **दर्ग्याला** घेऊन चल!
- अम्मा, मला **शिर्डीला** घेऊन चल!
- अम्मा, मला **सुवर्णमंदिर** दाखव



**लेखक : भक्ति माथुर**
**अनुवाद : डॉ. वृषाली पटवर्धन**
किंमत प्रत्येकी : रु. १९५
पोस्टेज अतिरिक्त
ई–बुक उपलब्ध

## पुस्तक परिचय




# कॉर्पोरेट कबीर

**गुरुचरण सिंग गांधी**

अनुवाद

**सायली गोडसे**

*कबीराने दोह्यांतून मांडलेलं तत्त्वज्ञान आणि आजच्या कॉर्पोरेट युगातील व्यवस्थापन याची घातलेली उपयुक्त, मार्गदर्शक सांगड*

‘कबीर इन कॉर्पोरेट्स’ या गुरूचरण सिंग गांधी यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकाचा सायली गोडसे यांनी मराठीत अनुवाद केला आहे. मध्ययुगीन काळात संतकवी असलेला कबीर हा त्याच्या सहज, सुलभ दोह्यांसाठी आजही जनसामान्यांमध्ये लोकप्रिय आहे; विशेष म्हणजे तो समोरील व्यक्तीला कार्यप्रवण करतो. सुमारे पाचशे वर्षांपूर्वी कबीराने सुनावलेले रोखठोक बोल, मार्मिक टीका आणि जीवनविषयक गहिरे तत्त्वज्ञान आजच्या युगातही दैनंदिन जीवनासाठी आदर्श वस्तुपाठ आहे. कबीराचे बोल, कृती आणि विचारांना आजही तेवढेच महत्त्व आहे. कबीराचे सारे आयुष्य एक गूढ होते; पण त्याने अनेक दोह्यांतून दिलेले संदेश आणि आजच्या काळातही चपखलपणे लागू पडणारी त्यांची समर्पकता अगदी स्पष्ट आहे. संत कबीराने केलेली कृती, मांडलेले विचार आजही आदर्श मानले जातात आणि सर्व पंथांच्या लोकांकडून ते अनुसरले जातात. आजच्या युगातील व्यवस्थापकासमोर केवळ व्यवसाय नव्हे, तर नीतिमत्ता, स्थैर्य, सार्वजनिक आयुष्यातील सचोटी आणि सामाजिक बांधिलकी असे अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत. विविध व्यवसाय आणि त्यांचे व्यवस्थापक यांना अनेकदा टोकाच्या परिस्थितीचा सामना करावा लागतो, ज्यावर त्यांचे फारच थोडे नियंत्रण असते. मात्र, आजचा आधुनिक व्यवस्थापकदेखील कबीराचे विचार अंगीकारून आपल्यापुढील अनेक समस्यांचा मुकाबला करू शकतो. आधुनिक युगातील भारतीय व्यवस्थापकांसाठी ‘कबीर इन कॉर्पोरेट्स’ हे पुस्तक एक उत्तम मार्गदर्शक ठरणार आहे. एखाद्यासाठी प्रेरक म्हणून कसे काम करायचे, टीकेचा सामना कसा करायचा, आपल्या स्वतःच्या निर्णयामध्ये सुस्पष्टता कशी मिळवायची या आणि अशा प्रकारच्या सगळ्या मुद्द्यांवर कबीराचे विचार आजही तेवढेच समर्पक आणि उपयुक्त आहेत, जेवढे पूर्वी होते.

हे पुस्तक सर्व व्यावसायिक आणि कर्मचाऱ्यांसाठी आहे; त्याचप्रमाणे नव्या पिढीतील व्यवस्थापक आहेत; ज्यांना व्यवसायाचे, कामकाजाचे प्रारूप आणि सिद्धान्त सांगण्यात आले आहेत; परंतु लोक, परिस्थिती आणि घडामोडी यांच्याशी जुळवून कसे घ्यायचे ते माहीत नसते. हे पुस्तक त्या नवथर व्यवस्थापकांसाठीसुद्धा उपयुक्त आहे. गोंधळाच्या किंवा पेचप्रसंगाच्या क्षणी कबीराच्या दोह्यांचा हा अभ्यास एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे दिशा

दाखवेलच; पण जहाजाच्या नांगरासारखा खंबीरपणे न डगमगता उभे राहायला मदतदेखील करेल.

एका मूलभूत प्रश्नाची उकल करण्याच्या प्रेरणेतून या पुस्तकाची निर्मिती झाली. तो प्रश्न म्हणजे : 'आजच्या काळात बाजारपेठेत आपले स्थान पटकावण्यासाठी अत्यंत कठोर अहमहमिकेतून, हिंस्र स्पर्धा सुरू असताना देखील कामकाजाच्या ठिकाणी मानवता प्रस्थापित करता येईल का?' या संदर्भात कबीराच्या दोह्यांचे भाषांतर करून त्याचा बोली भाषेतील अर्थ येथे मांडला आहेच; पण त्याच्याच जोडीला आजच्या जगाशी संयुक्तिक आणि आधुनिक व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल असा दोह्यांतील गर्भितार्थ समजावून सांगण्याचे कामही या पुस्तकाने केले आहे; त्याद्वारे कबीराच्या विचारांचा आणि व्यावहारिक चातुर्याचा आदर्श अनमोल खजिनाच जणू वाचकांपुढे मांडला आहे.


**नवी संहिता... नवा आशय...**




ध्यासपर्व

म धु वं ती स प्रे

रूढी परंपरांचा जाच...
पुरुषी मानसिकतेचा काच...
तरीही त्या बाराजणींनी घेतला
अपूर्वतेचा ध्यास

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**

**TBC-30 Book No. 6**






Master story teller

जेफ्री आर्चर यांच्या

'द क्लिफ्टन क्रॉनिकल्स'

या मालिकेचा पाचवा भाग

---

**TBC-31 Book No. 1**






Master story teller

जेफ्री आर्चर यांच्या

'द क्लिफ्टन क्रॉनिकल्स'

या मालिकेचा सहावा भाग

---


**जेफ्री आर्चर**

अनुवाद

**लीना सोहोनी**

**किंमत : प्रत्येकी ६६०/-रु.**
**TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**
**पोस्टेज ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# स्थलांतर

**उमेश कदम**

*‘भूमध्य समुद्रातून अत्यंत धोकादायक प्रवास करून बेकायदेशीरपणे युरोपला स्थलांतर करू इच्छिणाऱ्यांच्या आयुष्यात पदोपदी घडत असणाऱ्या हृदयद्रावक, सत्य घटनांवर आधारित नाट्यमय, माहितीपूर्ण आणि उत्कंठावर्धक कादंबरी.*

'स्थलांतर' ही सत्य कहाणी आहे सेमिरा किफले या तरुण मुलीची.

एरिट्रिया हा ईशान्य आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील छोटासा देश. सेमिरा त्या देशाची नागरिक होती. तिचे आई-वडील निवर्तले होते. स्थलांतरित झालेल्या भावाशी, आरोनशी तिचा संपर्क नव्हता. देशातील एकूण अराजक पाहता सेमिरानेही स्थलांतराचा निर्णय घेतला. अर्थातच सरकारची स्थलांतराला परवानगी नसल्यामुळे तिला ते बेकायदेशीररीत्या करावं लागतं. मैत्रिणीच्या मेहुण्याच्या मार्गदर्शनानुसार ती सुदानची राजधानी खार्तूम इथे जाते. तिथे त्याची चुलत बहीण योहाना सेमिराला एका इटालियन रेस्टॉरंटमध्ये कुकची नोकरी मिळवून देते. या नोकरीतून पैसे साठवून लिबियामार्गे युरोपात स्थलांतर करण्याचा तिचा विचार असतो. तेही स्थलांतर बेकायदेशीर रीतीने करावं लागणार असतं.

खार्तूममध्ये चार वर्षं नोकरी केल्यावर सेमिराला वेध लागतात युरोपमध्ये जायचे. त्यासाठी एका दलालाच्या सल्ल्यावरून छाद या देशाची राजधानी अंजामेना इथे ती जाते. अंजामेना इथून इटली आणि तिथून युरोपचा किनारा असा तिचा प्रवास होणार असतो. अंजामेना इथे ख्रिस नावाचा एक दलाल सेमिराला भेटतो, जो लोकांना युरोपपर्यंत पोचविण्याचं काम करत असतो. साधारण दहा-पंधरा दिवसांनंतर सेमिराची युरोपला जाण्याची सोय केली जाईल, असं ख्रिस तिला सांगतो; मात्र प्रत्यक्षात काही ना काही कारणाने तो तिचं युरोपला जाणं लांबवत राहतो.

ख्रिसच्याच घरात राहणाऱ्या सेमिराला त्याच्याकडून लग्नाचं आमिष दाखवलं जातं आणि त्यांच्यात शारीरिक संबंध प्रस्थापित होतात. अंजामेनाला आल्यावर दहा-पंधरा दिवसांनंतर सेमिराचं युरोपच्या प्रवासासाठी निघणं अपेक्षित असताना प्रत्यक्षात ती सात-आठ महिन्यांनी युरोपला जायला निघते. अर्थातच ख्रिसनेच ही सोय केलेली असते. तिच्यापाठोपाठ काही दिवसांतच युरोपला पोचण्याचं आश्वासन त्याने सेमिराला दिलेलं असतं. अंजामेनाहून अबू कामाशला गाडीने आणि त्यानंतर अबू कामाश ते इटली बोटीने, असा सेमिराचा आणि इतर स्थलांतरितांचा प्रवास होणार असतो.

त्याप्रमाणे सेमिरा गाडीने अबू कामाशला इतर स्थलांतरितांसह येते

आणि तिथून बोटीने त्या सगळ्यांचा इटलीकडे प्रवास सुरू होतो; मात्र वाटेतच त्यांची ही बोट लिबियाच्या गस्त पथकाकडून अडवली जाते आणि बोटीतील सगळ्यांना दोन महिन्यांसाठी तुरुंगात टाकलं जातं. तुरुंगातील अस्वच्छता, तेथील कर्मचाऱ्यांची असंवेदनशीलता आणि बेचव जेवण यामुळे सेमिराला ते दोन महिने दोन वर्षांसारखे वाटतात. भरीत भर या तुरुंगवासाच्या दरम्यान तिला दिवस गेल्याचं तिच्या लक्षात येतं; मात्र तुरुंगातून बाहेर पडल्यावर ख्रिसला ही आनंदाची बातमी द्यायचं ती ठरवते.

तुरुंगातून सुटल्यावर परत अंजामेनाला जाणं सेमिराला क्रमप्राप्त होतं. तिथे गेल्यावर नवनवीन मुलींना जाळ्यात ओढण्याची ख्रिसची सवय आहे आणि त्याने तिला फसवलं आहे, ही वस्तुस्थिती तिला समजते आणि ती मनाने उद्ध्वस्त होते. तिला परत निर्वासित कार्यालयाकडे जाण्याशिवाय पर्याय नसतो. तिथे जाऊन निर्वासित साहाय्य अधिकारी रेमा बुस्तानी यांची भेट घेऊन तिच्या बाबतीत काय काय घडलं ते ती त्यांना आडपडदा न ठेवता सांगते. त्या कार्यालयामार्फत तिच्या निवासाची सोय केली जाते; पण ती काही कायमची नसते. पुढे काय, हा प्रश्न सेमिरासमोर आ वासून उभा असतो.

अशातच तिला स्मृतिभ्रंशाचा आजार जडतो. म्हणजे तिला कधी कुठल्या गोष्टीचं विस्मरण होईल, हे सांगताच येत नसतं. त्यामुळे तिची रवानगी सरकारी रुग्णालयातील मनोरुग्ण विभागात करण्यात येते. अशा मानसिक अवस्थेत ती एका मुलीला जन्म देते; मात्र तिच्या मानसिक आजारामुळे तिची मुलगी, एका दाम्पत्याकडे काही कालावधीसाठी सांभाळायला दिली जाते. सेमिरा बरी व्हावी म्हणून रेमा आणि निवासी व्यवस्थेची व्यवस्थापिका वफा खूप धडपडत असतात. तिचा प्रेमाने सांभाळ करत असतात; पण एके दिवशी सेमिरा रुग्णालयातून पलायन करते.

स्पेनमधील माद्रिद शहरात चांगली नोकरी मिळवून, विवाह करून मार्गी लागलेला सेमिराचा भाऊ आरोनही तिच्या शोधात असतो. रेमा बुस्तानीही तिला शोधत असतात. ते दोघंही सेमिरापर्यंत कसे पोचतात आणि तोपर्यंत सेमिराच्या जीवनात आणखी कोणती नाट्यमय वळणं येतात, याची खिळवून ठेवणारी हकिकत म्हणजे 'स्थलांतर.'

**नवी संहिता... नवा आशय...**





## द ब्रिज ऑन द रिव्हर क्वाय

**पीअर बाऊल**

अनुवाद : **आनंद ठाकूर**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात क्वाय नदीवर पूल बांधण्याची जपान्यांची योजना... तर पूल उडवून देण्याची ब्रिटिशांची कामना...कोण होतं सफल? योजना की कामना? योजना-कामनेतील द्वंद्वाचं थरारक चित्रण

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




## हम्बर बॉय बी

**रुथ डगदाल**

अनुवाद : **सई साने**

एका खुनी बाल गुन्हेगाराचं पुनर्वसन...अडकतं सूडचक्रात...एका निष्पाप जिवाची हत्या एका निष्पापानेच केली असेल? एक उत्कंठावर्धक, थरारक कादंबरी

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# धर्मवेध

**ल. सि. जाधव**

*धर्म...एक कल्याणकारी संकल्पना...ही संकल्पना उलगडून दाखवणारी...सर्व धर्मांभोवती फिरणारी चिंतनीय कादंबरी*

ल. सि. जाधव यांचे सर्व धर्मांविषयी चिंतन म्हणजे 'धर्मवेध' ही कादंबरी होय.

कथानायक इतिहासाचे सेवानिवृत्त प्राध्यापक चैतन्य आनंद पत्नी - कमल हिच्या निधनानंतर अन्य काही पाश नसल्याने विरक्ती येऊन कधी घरी तर कधी माचणूर येथील आर्वीकर महाराजांच्या मठात राहतात. सहा महिन्यांनंतर तीर्थाटनाबरोबर तेथील स्थलदर्शनाच्या हेतूने हंपीला जातात. त्यानंतर काही दिवस कमलपूरम येथील मठात मुक्काम करतात. संन्यास घ्यायचा म्हणून जवळचे सुवर्ण-धन तेथे अर्पण करून संन्यास दीक्षाही घेतात. मात्र, श्मश्रु व केशवपन विधीला घाबरून शृंगेरी मठात जाऊन राहतात. तेथून पुढे ते मदुराईतील मीनाक्षी मंदिरास भेट देतात. तेथे त्यांचा परिचय त्यांच्यासारखेच इतिहासाचे अभ्यासक व मथुरानिवासी प्रोफेसर मित्तल यांच्याशी होतो. मग ते दोघे कन्याकुमारी येथे जातात. त्यानंतर चैतन्य आनंद रामेश्वर, तिरुमलाई येथील तिरुपती बालाजी अर्थात श्री व्यंकटेश्वराचे दर्शन घेऊन कोणार्क येथील सूर्यमंदिरानंतर जगन्नाथपुरीमधील कृष्णमंदिर आणि गया येथील बोधी वृक्षाला तसेच काशी व प्रयाग या तीर्थस्थानांना भेट देतात. पुढे ते मथुरा येथील कृष्णजन्मभूमी आणि अजमेरमधील मोईउद्दीन चिस्ती दर्ग्याचे दर्शन घेतात. श्रीकृष्णाच्या द्वारकेची सध्याची स्थिती पाहतात. नर्मदा नदीवरील विमलेश्वर शिवमंदिर पाहून नर्मदा परिक्रमेचा संकल्प करतात; तीसुद्धा अर्ध्यावर सोडून अखेर मुंबईमध्ये स्थिरावतात. तेथे चैतन्य आनंद चर्चगेटजवळ असलेल्या पारशी लोकांच्या फायर टेंपलला भेट देतात. मंदिर चालवणाऱ्या पारशी ट्रस्टच्या कार्यालयात लिखापढीचे काम पाहतात तसेच प्रसिद्ध एशियाटिक लायब्ररीत वाचन-लेखन व अभ्यास सुह्यच असतो. त्यांची कामावरील निष्ठा व प्रामाणिकपणा पाहून ट्रस्टींचा त्यांच्यावर विश्वास बसतो. ट्रस्टचे अध्यक्ष दोराबजी चोक्शी यांच्या पत्नीचे - मेहेर यांचे लोणावळ्यानजीक कमलापूर येथील कमळतळ्याजवळ चार एकरांवर फार्म हाउस असते. ब्लड कॅन्सरच्या आजारपणामुळे त्या ही जमीन एखाद्या चांगल्या कामासाठी चैतन्य आनंद यांना देतात. ते त्या ठिकाणी आश्रम काढून तेथे सर्व धर्मांचा अभ्यास व्हावा अशी सूचना करतात. चोक्शी पती-पत्नी ही कल्पना उचलून धरून त्यासाठी आवश्यक ती सर्व मदत देतात. कमलापूर येथे लेडी मेहेर कल्याण आश्रम साकार होतो. सर्व धर्मांचा अभ्यास व संशोधनासाठी जरूर त्या सर्व सोयी तेथे उपलब्ध असतात. त्याच्या प्रमुखपदाची जबाबदारी अर्थातच चैतन्य आनंद यांच्याकडे सोपवली जाते. ते

या आश्रमाचा चढता आलेख पाहतात आणि अपघाताने त्यांना स्वत:ला आलेल्या अपंगत्वामुळे आश्रमाला लागलेली उतरती कळाही अनुभवतात. सर्वधर्मसमभाव हे या कादंबरीचे सूत्र आहे. यामध्ये ओघाने ऐतिहासिक अथवा पौराणिक संदर्भ किंवा तदनुषंगिक स्थलवर्णन आले असले तरी ते कल्पना व जीवनाचे वास्तव रूप हे प्रवाह बरोबर घेऊन धर्माच्या अनुरोधाने अधिक माहिती देतात. त्यात 'धर्मो रक्षति रक्षितः'पासून ते 'धर्मो जयति, न अधर्मः'पर्यंत विचार मांडला आहे किंबहुना 'स्वधर्मे निधनं श्रेयः, परधर्मो भयावहः' अशीही धर्माविषयीचा धाक असलेली संकल्पना धर्मानुयायांत रूढ केली गेली. लेखकाने धर्माचा विशेषत: सर्वधर्मविषयक समान तत्त्वांचा जाणीवपूर्वक अभ्यास केला, तेव्हा धर्माबाबत 'जयोऽयम् अजयाकरो' या अनोख्या श्लोकाची भर पडली. याचा अन्वयार्थ तपासला असता 'जय होऊनही जो पराजयासारखा भासतो तो' म्हणजे धर्म यावर एकमत झाले. सर्व धर्मांत एकसमान धागा अनुस्यूत असल्याचे लक्षात आले. प्रेम, बंधुत्व, सत्य, शिव आणि सौंदर्य या पंचसूत्रीवर सर्व धर्मांची मूलधारणा समतोल उभी आहे. प्रत्येक धर्म आपापल्या ठिकाणी श्रेष्ठ, पवित्र व मानवी कल्याणाच्या भूमिकेतूनच निर्माण झाला आहे. सर्व धर्मांत सकल कल्याण, प्रेम व बंधुता आहेच. धर्माविषयीची सर्वसमावेशक भूमिका मांडण्याचा हा प्रयत्न आहे. प्रत्येकाला पूर्वजांकडून वडिलोपार्जित धर्म जन्मत: मिळतो. अर्थात धर्म ही प्रत्येकाची जगण्याची शैली आहे. ती आनंदमय, सुखमय व सगळ्यांचे कल्याण चिंतणारीच असायला हवी; पण तसं होत नाही. माणसे धर्मकलह मांडून बसतात. मग धर्मयुद्धापर्यंत त्यांची मजल जाते. सर्व धर्मांत भेद आहेतच; मतभिन्नताही असू शकते. शिया, सुन्नी हे वेगळे पंथ असले तरी अखेर सगळे अल्लाचेच बंदे आहेत. हिंदूतही उभे - आडवे गंध असे आहेच. बौद्धांमध्ये हिनयान व महायान, ख्रिस्तांत कॅथॉलिक, प्रोटेस्टंट तसेच जैनात श्वेत व दिगंबर असे भेद आहेतच. हे भेद महत्त्वाचे नाहीत. हे स्वाभाविक आहे. मतमतांतरे हीसुद्धा स्वभावाची मूलभूत रचना आहे. मार्ग अनेक, पण साध्य एक हे ठीक आहे; पण मार्गामध्ये संघर्ष अथवा कलह नकोत. मार्गात श्रेष्ठत्व, कनिष्ठत्व असा भाव नको. केवळ संकुचितपणे आपलाच धर्म कवटाळून राहणे योग्य नाही; त्यामुळेच तर नुकसान होते. साध्य काही हाती लागत नाही. सर्वधर्मांची तत्त्वे सकल मानवाच्या कल्याणाचीच आहेत.

ज्याला जे योग्य वाटेल ते करायची मुभा असावी. म्हणजे जगणं सोपं होईल; पण असं होत नाही. हीच तर व्यथा आहे. जे करायचं ते मुळातून जाणून घ्या, समजून घ्या, त्यामागचं मर्म नीट अभ्यासून मग ते करा. बुद्धिवादी व्हा, विवेकदृष्टी ठेवा, जे न पटणारं असेल ते कसोटीवर तपासून पाहा; त्यात काही विज्ञाननिष्ठ असू शकतं. त्यावर विचारविनिमय, चर्चा, नवा चिंतन-विचार करा असंच आवाहन आहे. अज्ञान, अजाण, अशिक्षित समाजास चांगलं शिकवायला पाहिजे. त्यांना बंधुत्वाचा, सद्धर्माचा, कल्याणाचा मार्ग दाखवायला हवा. अर्थात या विचारात काही चमत्कार वा नावीन्य नाही. सर्व धर्मांतील समान तत्त्वांवर भर दिलेला आहे आणि म्हणून सर्वजण सर्वधर्मसमभावाची भावना जपू, एकदिलाने राहू, तेही आपापला धर्म अबाधित राखून; एवढंच अपेक्षित आहे.


**नवी संहिता... नवा आशय...**





जोहड

**सुरेखा शहा**

रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते,
राजस्थानमधील बंजर जमिनीचा
कायापालट करणारे जलदूत
राजेंद्रसिंहांची संघर्षगाथा...

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# बोल बच्चन

**रुपेश दुबे**

अनुवाद

**मंजुषा मुळे**

*बॉलीवूडचा शहेनशाह बिग बी आणि त्याच्या जादुई आवाजानं अजरामर झालेले संवाद म्हणजे जणू भारतीयांसाठी अखंड प्रेरणेचा स्रोत... असेच अठरा लक्षवेधी 'बोलबच्चन' देत आहेत जगण्याचं बाळकडू*

आपल्या आजूबाजूला अशी अनेक व्यक्तिमत्वं आहेत ज्यांचं आयुष्य प्रेरणेने ओतप्रोत भरलेलं आहे. ज्या लोकांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात कल्पनेपेक्षाही जास्त यश आणि प्रसिद्धी प्राप्त केली अश्या महान व्यक्तींपैकी एक आहेत सुप्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन. या पुस्तकाचे नाव 'बोलबच्चन' असून याचे मूळ लेखक आहेत रुपेश दुबे तर याचा मराठी अनुवाद केला आहे सौ. मंजुषा मुळे यांनी.

सिनेमाच्या मोठ्या पडद्यावर वेगवेगळ्या भूमिका निभावणारा एखादा कलाकार खऱ्या आयुष्यात किती प्रेरणादायी जीवन जगत असतो, याचे आकलन करणे हाच एक वेगळा आणि गहन विचार आहे. आणि हाच विचार घेऊन लेखक रुपेश दुबे यांनी महानायक अमिताभ बच्चन यांच्या चित्रपटातील नकारात्मक भूमिकांमधूनही सकारात्मक दृष्टीकोन शोधून काढत या पुस्तकांद्वारे वाचकांसमोर एक नवा विचार मांडलेला आहे. या पुस्तकाचे नाव 'बोलबच्चन' असे जरी असले तरी यामधून बच्चनजी यांचे व्यक्तित्व किंवा त्यांचा महिमा सांगण्याचा मुळीच उद्देश नसून त्यांना त्यांच्या चित्रपट कारकीर्दीत आलेले अनुभव, त्यात त्यांच्याकडून झालेल्या चुका आणि त्यांतून त्यांना वेळोवेळी मिळत गेलेली शिकवण याचा परिपाठ मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. हे पुस्तक जितके प्रेरणादायी आहे तितकेच मनोरंजकसुद्धा आहे. आणि जर वाचक चित्रपटप्रेमी असेल तर दुधात साखर! पण केवळ मनोरंजन करणे हा या पुस्तकाचा हेतू नाही. एक अयशस्वी व्यक्ती ते करोडो मनांवर राज्य करणारा महानायक असा अमिताभ बच्चन यांचा चित्तथरारक प्रवास या पुस्तकातून वाचकांसमोर उलगडलेला आहे. आयुष्यात आलेल्या अनेक चढ-उतारांना सामोरं जात बच्चनजी यांनी यशाच्या शिखरावर आपलं स्थान कश्याप्रकारे अढळ ठेवलं हे या पुस्तकाद्वारे जाणून घेणं फारच विस्मयकारक आहे.

'अंग्री यंग मॅन' अशी उपाधी मिरवणारे अमिताभ बच्चन 'देवियों और सज्जनो' म्हणत आजही अनेक मनांचा ठाव घेतात. या पुस्तकात केवळ अमिताभ यांच्या जगण्याचा, अभिनय कारकीर्दीचा किंवा व्यक्तिगत जीवनाचा लेखाजोखा मांडलेला नसून त्यांच्या करियरला 'चार चाँद' लावणाऱ्या मोहम्मद रफी यांच्या गाण्यांचा, साहीर लुधियानवी यांच्या शायरीचा, खय्याम यांच्या संगीताचा आणि हरिवंशराय बच्चन यांच्या कवितांचा उल्लेख केला

गेला आहे. यासोबतच 'ॲप्पल' कंपनीचे सर्वेसर्वा असलेले स्टीव्ह जॉब्स यांचा जीवनसंघर्ष, के. एफ. सी चे कर्नल हर्लांड डेव्हिड सँडर्स यांचा विलक्षण असा प्रेरणादायी जीवनप्रवास आणि जीवनात कधीही हार न पत्करण्याची महत्वाकांक्षा फार सुंदररीत्या या पुस्तकात शब्दांकित केली गेली आहे.

क्रिकेटसारख्या जागतिक स्तरावर आवडल्या जाणाऱ्या आणि क्रिकेटवर मनापासून प्रेम करणाऱ्या वाचकांसाठीही हे पुस्तक म्हणजे मेजवानीच आहे. क्रिकेटचा देव म्हणून ओळखले जाणारे मास्टरब्लास्टर सचिन तेंडुलकर हे या पुस्तकाच्या दुसऱ्या नायकाप्रमाणे भेटतात. सोबतच इतर क्रिकेटपटू जसे की, महेंद्रसिंग धोनी याने मिळवलेलं यश, सौरव गांगुली आणि इमरान खान यांचे खुमासदार किस्से हे सुद्धा या पुस्तकात वाचायला मिळतात. ज्यातून केवळ आपल्याला प्रेरणाच मिळत जाते.

कधीकधी आपल्याच आजूबाजूला असे लोक असतात ज्यांच्याकडे बघून आपल्याला एक नवी शिकवण एक नवा बोध होत जातो. जसे की, आपल्या कुटुंबातील काही व्यक्ती, आपले शेजारी, नातेवाईक, मित्रमंडळी, आपल्याला कामात मदत करणारे आपले सहकारी किंवा आपले वरिष्ठ अधिकारी इत्यादी. या सगळ्याचे उदाहरण देताना लेखक रुपेश दुबे यांनी आपल्या व्यक्तिगत आयुष्यात बांधिलकी असलेल्या प्रेरणादायी व्यक्तीबद्दल असलेलं फार प्रामाणिक मत अतिशय प्रांजळपणे मांडलेलं दिसून येतं. जे वाचून वाचकालाही त्यांच्याच जवळपास असलेल्या पण कधी फारसं महत्व न दिल्या गेलेल्या व्यक्तिमत्वांची प्रतिमा पुस्तक वाचताना डोळ्यासमोर दिसू शकते.

केवळ चित्रपट, खेळ यासारख्या विषयांपुरतं मर्यादित न राहता हे पुस्तक बुद्ध, कबीर, रहीम, तुलसीदास, गालिब आणि हेनरी डेव्हिड थोरो यासारख्या महान तत्ववेत्त्यांचा उल्लेख करत एका वेगळ्याचं उंचीवर जाऊन पोहोचतं. आणि म्हणूनच हे पुस्तक प्रेरणादायी तर ठरतंच पण त्यासोबतच ज्ञानवर्धकसुद्धा वाटत राहतं. या पुस्तकात एक फार मोठी आणि अनोखी गोष्ट जोडली गेलेली आहे ती म्हणजे ज्याकाळात मोबाईल, सेलफोन यांच्या जन्मापासून ते त्याच्या सामान्य माणसाच्या हातात पोचण्याचा प्रवाससुद्धा यात मांडला गेलेला आहे. जो की, अतिशय सफाईने या पुस्तकाच्या मूळ

विषयाशी असलेल्या नात्याचा प्रत्यय देत राहतो. सोशल मिडीयासारखा व्यापक मंच, इंस्टाग्रामची जन्मकथा, शाहरुख खान आणि आमीर खान ते चेतन भगत आणि अमित त्रिपाठी यांच्या यशाचं रहस्य उलगडणारे हे पुस्तक फार प्रभावी, परिपूर्ण आणि वाचनीय बनत जाते.

हे पुस्तक वाचत असताना एक गोष्ट क्षणोक्षणी अधोरेखीत होत राहते की, ज्या व्यक्तींच्या ऐश्वर्यसंपन्न आणि सुखसोयींनी भरलेल्या जगण्याला आपण कायम भुलत राहतो त्यांना ह्या सगळ्या गोष्टी सहजपणे अजिबात मिळालेल्या नसतात. त्यांचेही आयुष्य सामान्य माणसाच्या आयुष्याइतकेच खडतर आणि समस्यांनी भरलेले असते. पण या समस्यांना घाबरून न जाता त्यांच्यावर मात करत यशाचा मार्ग शोधून काढत ते यशस्वी होतात. आणि कठोर मेहनत आणि अथक परिश्रमांच्या जोरावर प्रेरणादायी व्यक्तिमत्व बनत जगासमोर ताठ मानेने उभे राहतात.

अमिताभ बच्चन यांच्या अनेक गाजलेल्या चित्रपटातील संवादांच्या शिर्षकांनी सजलेले आणि 'कोन बनेगा करोडपती' मधल्या बच्चन यांच्या अंदाजात लेखाचा शेवट करणारे हे पुस्तक वाचकांच्या मनात नक्कीच एक वेगळा ठसा उमटवते.

■


**नवी संहिता... नवा आशय...**




**हाल्या हाल्या दुधू दे!**

**बाबाराव मुसळे**

न्यानबा या शेतकऱ्याची
मन हेलावून टाकणारी बाबाराव मुसळे
यांची विलक्षण कादंबरी

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# एके दिवशी

**डॉ. गिरीश वालावलकर**

*उद्योगसमूह, राजकारण, गुन्हेगारी आणि आर्थिक अफरातफर यांचा परस्पर संबंध अलगद उलगडत श्रीधर, चारुलता, यशवंत या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मानवी स्वभावाचे पैलू स्पष्ट करणारी कादंबरी*

श्रीधर, चारुलता, यशवंत या तिघांचं आयुष्य एकमेकांपासून संपूर्ण वेगळं आहे... त्यांच्या  समस्या एकमेकांपासून पूर्णपणे वेगळ्या आहेत... त्यांच्यामध्ये परिस्थितीशी संघर्ष करण्याची प्रचंड जिद्द आणि प्रेरणा आहे... परिस्थितीने समोर ठेवलेल्या सर्वनाशाच्या एकमेव पर्यायाला धुडकावून लावत ते परिस्थितीलाच आव्हान द्यायला उभे ठाकले आहेत - 'एके दिवशी'....


उद्योग समूह, राजकारण, गुन्हेगारी, आणि आर्थिक अफरातफर यांचा परस्पर संबंध अलगदपणे उलगडून दाखवत कथानक वेगाने पुढे सरकत राहतं त्या सर्वांचे सामान्य माणसाच्या जीवनावर होणारे परिणाम जाणवत मनाला भिडतात... संमोहित करणाऱ्या शैलीमध्ये कथानक उलगडत जातं... वेगवान घटना, सुस्पष्ट व्यक्तिरेखा, प्रवाही प्रसंग वाचकाला खिळवून ठेवतात...

अत्यंत वेगवान आणि उत्कंठावर्धक कथानक... मराठी वाचकांना फारसे परिचित नसलेले जग.. अनलंकृत आणि अगदी सोपी भाषा, साधी सरळ वाक्यरचना... यामध्ये वाचक गुंतून जातो. अनेक रंजक तपशील आणि वर्णनातील बारकावे रंग भरत राहतात...

कथानकाचे नाविन्य आणि विषयाचे खुमासदार तपशील वाचकांचे मनोरंजन करत, कुठलाही अभिनिवेश न आणता, त्यांना खूप काही देऊन जातात.

'सी. ई. ओ.च्या केबिन मधून...' आणि 'लॅडरवरच्या संवेदना' या यशस्वी पुस्तकांनंतर डॉ. गिरीश वालावलकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली नवी कादंबरी - 'एके दिवशी' ...

## पुस्तक परिचय




# अराजक

■

**विल्यम डॅलरिंपल**

अनुवाद

**रेश्मा कुलकर्णी-पाठारे**

■

*हजारो मैल दूर असलेल्या कंपनीनं चार खोल्यांच्या कार्यालयातनं दोन लाख सैनिकांच्या बळावर भारतावर वर्चस्व गाजवलं. या वसाहतवादी गळचेपीत भारताची लूट केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या या जुलमी कारकिर्दीचा सडेतोड विल्यम डॅलरिंपल यांनी घेतलेला धांडोळा.*

‘द ॲनार्की’ (अराजक), विल्यम डॅलरिम्पल यांनी या ऐतिहासिक पुस्तकाच्या एकूण नऊ प्रकरणांतून जगातल्या सर्वांत श्रेष्ठ आणि बलाढ्य मुघल साम्राज्याची कशी वाताहत झाली, याचा धांडोळा घेतला आहे. केवळ पाच खिडक्या असलेलं लहानसं ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचं कार्यालय; पण त्याने जगावर हुकूमत गाजवली. एका तरुण मुघल सत्ताधीशाला १७६५च्या ऑगस्ट महिन्यात ईस्ट इंडिया कंपनीने पराभूत केले व सर्वांत धनाढ्य प्रदेशामध्ये नवीन प्रशासन प्रस्थापित केलं. खासगी लष्कर बाळगून जबरदस्तीने कर वसुली सुरू केली. कंपनीच्या पायाभरणीच्या सनदेनुसार त्यांना युद्ध सुरू करण्याची मुभाही मिळाली होतीच. केवळ रेशीम व मसाल्यांचा व्यापार करणाऱ्या अगदी छोट्याशा कालावधीत या आंतरराष्ट्रीय संस्थेतून आक्रमक वसाहतवादी शासनव्यवस्था निर्माण झाली. दोन लाख माणसांना प्रशिक्षण देऊन ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीनं इंग्रज सरकारचं सुसज्ज व अद्ययावत लष्कर उभं केलं. फ्रान्स (नेपोलियन), पोर्तुगालशी, हिंदुस्थानशी सुरुवातीला फिरंग्यांच्या चकमकी होत होत्याच. १७९२ हे वर्ष कंपनीसाठी मैलाचा दगड ठरले. प्रथम बंगाल काबीज करून १८०३ मध्ये मुघल राजधानी दिल्ली त्यांनी ताब्यात घेतली व संपूर्ण हिंदुस्थानवर आपली पकड घट्ट केली. १६१८- १७९४ या कालावधीत आलमगीर औरंगजेब-मुहम्मद शहा रंगीला, गाझी उद्दिन खान /इमाद उल-मुल्क, शहा आलम, बंगालचे नवाब-अलिवर्दी खान, नवाब-सिराज उद्दौला, नवाब-मीर जाफर, अवधचा नवाब-शुजा उद्दौला, रोहिला नजीब खान युसुफझाई, नजीब उद्दौला, (मृ.१७७०), झबिता खान (मृ.१७८५), गुलाम कादिर खान रोहिला, हैदर अली (मृ.१७८२), टिपू सुलतान, छत्रपती शिवाजीराजे भोसले (मृ.१६८०), नाना फडणवीस, महादजी शिंदे, तुकोजी होळकर-(१७२३पानिपतच्या युद्धातील धाडसी सरदार) या सर्व पराक्रमी वीरांनी आपापल्या कारकिर्दीत ब्रिटिश लष्कराला झुंज दिली. त्यांच्या खेळी उलथवल्या. निकराचा सामना केला, कधी त्यांची सरशी झाली तर कधी तह झाला तर कधी अपरिमित हानीही झाली. मराठ्यांची महादजी शिंदेंची रणनीती, पराक्रम पाहून इंग्रज थक्क झाले; तरीही फिरंग्यांचे हिंसक, जुलमी प्रकार चालूच होते. कंपनीच्या राक्षसी अवतारासमोर सर्वांनी हात टेकले. नवाबांच्या आपापसातील बंडाळीचा फायदा ईस्ट इंडिया कंपनीने घेतला.

इंग्रज अधिकारी भारतीयांना बेदम मारहाण करत. जबरदस्तीने पैसा लुटत. सतत कडाडणाऱ्या तलवारी आणि अराजक चालू राहिल्याने मानसिक खच्चीकरण व समाजजीवन असुरक्षित होत होते. म्हणूनच ही दुष्ट नीती ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अवलंबली. सक्तीचं खासगीकरण केलं. सागरी मार्गाने हिंदुस्थानात येऊन ब्रिटिशांनी अखेर देश लुटला. त्यांनी व्यापार वाढवला. स्वत:चा देश श्रीमंत केला आणि हिंदुस्थानच्या राजकारणात हस्तक्षेप करून प्रचंड अराजक माजवलं. अशा दुष्ट नीतीपासून आपण आज काय धडा घ्यावा, याचं उत्तम मार्गदर्शन करणारं विल्यम डॅलरिम्पल यांचं हे पुस्तक म्हणजे धाडसी, साहसी पराक्रमी, त्यागी, देशप्रेमी वीरांच्या कर्तव्यतत्परतेची प्रेरणादायी परमगाथाच आहे; शिवाय हे पुस्तक म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीच्या 'अराजका'चा विस्तृत, ससंदर्भ लेखाजोखा म्हणता येईल.

■


नवी संहिता... नवा आशय...




# उदयास्त

**सहना विजयकुमार**

अनुवाद

**अपर्णा नायगांवकर**

एकीकडे कामाठीपुऱ्यातलं भीषण वास्तव तर दुसरीकडे विठ्ठल भक्तीत रंगलेला पोरका नायक...
या दोन्हींचा अनोखा संगम साधत, बारकाईने अभ्यास करून रचलेलं दमदार कथानक

**किंमत : ४९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**




# दोन शिंगे असलेला ऋषी

**सुधा मूर्ती**

अनुवाद

**लीना सोहोनी**

भारतीय लोकप्रिय लेखिका सुधा मूर्ती यांनी शब्दबद्ध केलेल्या भारतीय पुराणांमधल्या साध्या सोप्या, अतिशय प्रवाही आणि प्रत्ययकारी भाषेतल्या कथांचा संग्रह

---

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

---




# ॲम्नेस्टी

**अरविंद अडिगा**

अनुवाद


**सुनीता कट्टी**

बेकायदेशीररीत्या स्थलांतरित झालेला नायक जेव्हा मालकिणीच्या खुनाचा साक्षीदार होतो त्यावेळी त्याच्यावर ओढवलेल्या पेचप्रसंग आणि मायदेशी रवाना होण्याचा धोका याचा व्यामिश्रतेने वेध घेणारी कादंबरी

---

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# बाईची गोष्ट

**प्रा. पुरुषोत्तम रा. रामदासी**

*कामवासनेची अनंत रूपं मांडणाऱ्या या शृंगारकथा, लैंगिकतेसंबंधीच्या मानसिक प्रदूषणावर प्रहार करणाऱ्या विलक्षण कथा*

## जातीनं घडवलेल्या आत्मतत्त्वाची एकविसाव्या शतकातील रूपं

माझी आई (आजी - वडिलांची आई) मला तिच्या मऊशार कुशीत घेऊन, म्हणत असे, 'म्हवं लेकरू, किती नादर हाये. अशे इतके सुंदर डोळे कुणाचे तरी हायेत का? मज्या बाळा, तुज्यात इतके गुणं हायेत की मज्यासारख्या येडीला कुठं मोजता यायलंय?' रात्रीच्या वेळी माझ्याशी बोलताना, घरातल्या झिरो बल्बच्या जवळपास नसलेल्या उजेडातही तिचा काळवंडलेला चेहरा आणि रापलेली त्वचा चमकायची. मी आजीचा जीव की प्राण होतो, याची ती सतत जाणीव करून द्यायची.

अंधूक अंधूक प्रकाश असणारा स्वस्तात मिळणारा झिरो बल्बच आमच्या घरातला उजेडाचा एकमेव स्रोत. तो बंद होता. आजी मला धीर देत होती, समजावत होती. आमचं घर टोयोटाच्या मिनीबसएवढं. त्या एवढ्याशा घरात आजी, माझे आई-वडील, बहीण-भाऊ असे आम्ही सगळे राहत होतो. घरातल्या खाटेखालच्या जागेत माझे आजारी वडील, मी आणि भाऊ झोपायचो. आई आणि बहीण खाटेला लागूनच काटकोनात एका नायलॉनच्या चटईवर झोपत.

आजी माझ्या गालावरून हात फिरवत होती. आता ती डोक्याला मालीश करू लागली. तिच्या त्या मऊ हातांनी सारं काही सोसलं होतं. अस्पृश्यता, न्यूनगंड लादणाऱ्या परंपरा, तिच्या कुटुंबाचं पोट भरण्यासाठी शेतात, खाणीत भूमिहीन मजूर म्हणून राबण्याचा तिचा निग्रह किंवा एखाद्याच्या घरी नाही तर मिलमध्ये नोकर म्हणून राबणं. तिच्यासारख्याच चेहरा नसलेल्या, कसलीही ओळख निर्माण करू न शकलेल्या; पण तरीही खूप महत्त्वाच्या लोकांचं ती प्रतिनिधित्व करते. हिंदू धार्मिक संरचनेने काही लोकांना गावगाड्याबाहेर ढकललं. या लोकांची निर्भर्त्सना केली जाते, द्वेष केला जातो. कसलीही मानवी प्रतिष्ठा, मोल नसलेलं जगणं यांच्या वाट्याला येतं. सार्वजनिक अवकाशात दलितांनी इतरांकडे साधा कटाक्ष टाकला तरी संपूर्ण समाजावर त्याचा राग काढला जातो, त्यांच्यावर हिंसेची बरसातच केली जाते. त्यांच्या जिवाला कसलीही किंमत नाही, माझी आजी अशा लोकांचं प्रतिनिधित्व करते.

कोट्यवधी लोक हे असं आयुष्य जगतात. भारतात जातीप्रश्नाचा संबंध १३५ कोटी लोकांशी आहे. १०० कोटी लोकांच्या आयुष्यावर जातिव्यवस्थेचा परिणाम होतो. त्यांपैकी ८० कोटी लोकांवर जातीचा वाईट

परिणाम होतो. ५० कोटी लोकांची मानवी प्रतिष्ठा हिरावून घेतली जाते आणि त्यांच्यावर गुलामीचं जगणं लादलं जातं. ३० कोटी अस्पृश्यांचं भयंकर शोषण केलं जातं. माणसाला कराविशी वाटणार नाहीत, अशी कामं त्यांच्याकडून करून घेतली जातात. दलित वस्त्या उद्ध्वस्त करणं, त्यांच्यावर गुलामी- दास्यत्व लादणं, सक्तमजुरी, बलात्कार, हत्याकांड, जाळपोळ, लुटालूट, तुरुंगवास, पोलिसी अत्याचार, जातीय शिविगाळ-शेरेबाजी, अपमान, अवहेलना, त्यांचं नैतिक खच्चीकरण हे ३० कोटी भारतीय अस्पृश्यांचं जगणं आहे.

लहानपणी शाळेची फी वेळेवर भरता न आल्याने मला अवहेलना सहन करावी लागायची. शाळेचा कारकून टोनी - दर तीन महिन्यांनी वर्गांमध्ये फेरी मारायचा आणि माझं नाव पुकारून मला उभं राहायला सांगायचा. मी उभा राहिलो की तो माझी किती महिन्यांची फी भरायची बाकी आहे, हेही वाचून दाखवायचा. फीचा आकडा जेवढा जास्त तेवढं जास्त अपमानित वाटायचं. त्यात माझे वर्गमित्र थंडपणे माझ्याकडे पाहत एक तुच्छ कटाक्ष टाकायचे. त्या शरमेने मेल्याहून मेल्यासारखं वाटायचं. हे नेहमीचंच होतं. जेव्हा जेव्हा टोनी वर्गात यायचा तेव्हा मला शाळा सोडून पळून जावंसं वाटायचं. आमच्या वस्तीतल्या रोजंदारीवर खपणाऱ्या मजूर लोकांसोबत काम करावं, असं वाटायचं. समोर दिसेल त्या मार्गाने पोट भरणारे आणि जगण्याची भ्रांत नसलेले हे लोक त्यांच्या मर्जीने जगत. जगण्यासाठी त्यांना कुणाकडून अपमानित तरी व्हावं लागत नव्हतं.

सहाव्या इयत्तेत जाईपर्यंत मी त्यामानाने अतिशय गरिबीत जगलो. त्याच दरम्यान सरकारदरबारी दारिद्र्यरेषेखालील गरिबांमध्ये आमचा समावेश झाला. दारिद्र्यरेषा हे वंचिततेचं मोजमाप करण्याचं राज्यानं ठरवलेलं एक परिमाण आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेनुसार त्याचे सात निकष ठरवलेले आहेत. केरळमध्ये अशा प्रकारचे नऊ तर हरयाणामध्ये पाच निकष आहेत. कुटुंबांच्या मालकीची शेतजमीन, रोजगार, शैक्षणिक स्तर, मुलांची परिस्थिती, स्वच्छता, घरावरचं छप्पर, जमीन, पिण्यायोग्य पाणी, वाहतूक व्यवस्था, अन्न, घरात रंगीत टीव्ही, फ्रिज असणं...अशा प्रकारचे हे निकष आहेत. यामध्ये कुटुंबाचं उत्पन्न हा एक निकष असा होता, की जो एखाद्याकडे वरील सर्व घटक उपलब्ध आहेत की नाही, त्यावरून ठरत असे आणि राज्याराज्यात त्याबाबत भिन्नता होती. महाराष्ट्रात दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या १३ निकषांवर आधारित आहे. असे ४६ लाख लोक

दारिद्र्यरेषेखाली आहेत. (ही संख्या १९९० मधल्या दारिद्र्यरेषेखालील एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के आणि २००० मध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येच्या प्रमाणात ३९ टक्के इतकी आहे.)[१] २०१२ मध्ये जागतिक बँकेच्या अहवालात एकूण लोकसंख्येच्या १७ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली होते. या अहवालात महाराष्ट्राच्या उत्तर-पूर्व भागातील जिल्ह्यांमध्ये गरिबीचं प्रमाण वाढलेलं आहे, यावर भर देण्यात आला होता. नांदेड जिल्ह्यात १८ ते २४ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जगत होती. त्यातही अनुसूचित जातींतील कुटुंबं आणि इतर जातींतील कुटुंबं अशी वर्गवारी केलेली नव्हती. शहराच्या परिघावर असलेलं माझं कुटुंब 'दारिद्र्यरेषेखाली' या प्रवर्गात चपखल बसलं होतं.

जातीचा प्रश्न एखाद्या लोलकाच्या विविध मितींमधून पाहिला जातो. त्यामुळेच खरं तर भारतात अधिक चर्चा - संवाद करण्याची आवश्यकता असलेला 'जात' हा विषय अनेक गैरसमजुती आणि चुकीच्या धारणांनी वेढलेला आहे. 'जात' हा एक असा शब्द आहे, जो आरक्षण, दलित, आदिवासी, मानवी मैला, दलित भांडवलशाही, रोजंदारीने काम करणारे मजूर, क्रूर हिंसा, गुन्हेगारी, तुरुंगवास, राजपूत, ब्राह्मण, वाणी - बनिया, कायस्थ, ओबीसी अशा विविध शब्दांसाठी समानार्थी म्हणून विचारात घेतला जातो. जातीच्या नग्नतेच्या अशा अनेक रूपांना आपल्याला रोज सामोरं जावं लागतं. तरीही या सगळ्यामध्ये जात तिचं पावित्र्य बहुविध मार्गांनी जपते आणि मानवी जीवनाच्या प्रत्येक पैलूमधून आपला अजेंडा बळकट करत राहते ही बाब दुर्लक्षितच राहते. त्यावर चर्चाच केली जात नाही. सार्वजनिक आणि खासगी आयुष्याच्या विविध पैलूंमध्ये जात ज्याप्रकारे महत्त्वाची भूमिका निभावत असते, त्याची आपण कल्पनाही करू शकत नाही.

आमची शेतजमीन नव्हती आणि आमच्याकडे रंगीत टीव्ही, फ्रिजही नव्हता. वडीलही नोकरी करत नव्हते. (आयुष्यातला बराच मोठा काळ आजारपणामुळे ते अंथरुणाला खिळून होते.) त्यामुळे आमचं उत्पन्नही कमीच होतं. वडिलांच्या मालकीचं घर नव्हतं. वारसाहक्काने त्यांना मिळालेल्या जमिनीवर आम्ही राहत होतो. ३० बाय ४० फुटांची बास्केटबॉल कोर्टपेक्षाही निम्म्या आकाराची जमीन. या जमिनीची तीन कुटुंबांत समसमान वाटणी झाली होती. तिन्ही कुटुंबांची मिळून सोळा माणसं राहत होतो, त्यामुळे घरात स्वच्छतेच्या सोयी-सुविधांच्या नावानं बोंबच होती. एकच मोरी आणि संडास होता. सकाळच्या वेळेला आम्हा भावंडांची, चुलत

भावाबहिणींची शाळा साधारण एकाच वेळेला असायची, त्यामुळे संडासला, अंघोळीला जाण्यासाठी प्रत्येक जण रांगेत असायचा. घरात दहावीच्या पुढे कोणी शिकलेलं नव्हतं. आमचं छप्पर म्हणजे कच्च्या विटांवर तोलून धरलेले, गंजलेले, घळ्यांचे लोखंडी पत्रे. ते उडू नयेत म्हणून त्यावर दहा-वीस किलो वजनाचे मोठे दगड ठेवले जात. लोखंडी पत्र्यांतून वीज वाहते आणि पावसाळ्यात छपरावरचे दगड घसरून पडण्याचीही मोठी भीती होती. लोखंडी पत्र्यांमुळे हवामानात बदल होण्याचा अवकाश की, आम्हाला आधी चाहूल लागत असे. हे पत्रे आमच्यासाठी हवामानाचा अंदाज सांगणारे जिवंत स्रोत होते. बारीक थेंबांचा शिडकावा पाऊस येण्याची वर्दी द्यायचा. पत्र्यांमुळे त्या थेंबांचा जोरदार आवाज आम्हाला आधी कळायचा. उन्हाळ्याच्या दिवसांत कडक उन्हामुळे पत्रे असे तापायचे की खाली बसलेला माणूस गुदमरायचा, श्वास घेणंही मुश्कील व्हायचं. मजबूत आणि जाडजूड छपराअभावी थंडीच्या दिवसांतही त्रास व्हायचाच. तशा परिस्थितीत निर्दयी हवामानाचा सामना करत आम्ही त्या घरात झोपलो. लोखंडी पत्र्यांपासून कशीतरी आपली सुटका व्हावी, यासाठी आम्ही रोज प्रार्थना करायचो, चोवीस तास तोच विचार मनात असायचा. दुर्दैवानं ती प्रार्थना कधी फळाला आलीच नाही. आजोळी गेल्यावर मात्र सकाळी उठल्यावर, काल रात्रभर पाऊस पडून गेलाय हे कळायचंसुद्धा नाही. याचं मला आश्चर्य वाटायचं. आजोळच्या घराचं छप्पर जाडजूड आणि सिमेंटचं होतं, त्यामुळे पाऊस पडण्याचा आवाज ऐकू येत नसायचा. आमच्या घरी मात्र मुसळधार पावसाच्या आवाजाने रात्रभर झोप लागत नसे, अशी परिस्थिती होती.

त्यावेळी जगण्यासाठी मी मिळेल ते काम करत होतो. आई - वडिलांनी विरोध केला तरी त्या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरता मी अधीर झालो होतो. एकदा मी बुटांच्या कारखान्यात कामाला जाण्याचा विचार केला. आमच्या वस्तीतला एक मित्र तिथे मजूर म्हणून काम करत होता. तसेच एकदा माझ्या आजोळच्या नातेवाइकांसोबत विदर्भातल्या एका बागायती पट्ट्यात भुईमुगाच्या शेतावर कामाला गेलो होतो. वडिलांच्या वर्तमानपत्रासाठीही मी व्यवस्थापक म्हणून काम केलं. ट्रक चालकासोबत क्लीनर म्हणून काम केलं. वखारीत काम केलं. हातातोंडाची गाठ पडावी, याकरता हे सगळे प्रयत्न केले होते. मिसरुड फुटायच्या आतच मी मिळतील ती जोखमीची सगळी कामं केली होती.

**नवी संहिता... नवा आशय...**




# तोड

## स्वाती चांदोरकर

ऊसतोड कामगारांच्या जीवनाच्या
पार्श्वभूमीवर रंगलेलं भावनाट्य...
वात्सल्याचा एक वेगळा अध्याय

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवीन सुधारीत आवृत्ती...**





# गोफ

## वपु काळे

'वपुं'च्या कथांभोवती वेगवेगळ्या
लेखकांनी एकांकिकांच्या
आविष्काराचा विणलेला 'गोफ'

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# आजचा दिवस माझा

विजय अमृता कुलांगे
(IAS)

*काळाच्या मुशीत तावून सुलाखून प्राथमिक शिक्षक ते आयएएस अधिकारी असा प्रवास करणाऱ्या आयएएस विजय अमृता कुलांगे यांची जीवनजाणिवा समृद्ध करणारी यशोगाथा*

लेखक विजय अमृता कुलांगे यांचे ‘आजचा दिवस माझा’ हे पुस्तक आपल्याला आयुष्याकडे डोळसपणे पाहायला शिकवते. प्राथमिक शिक्षक, विक्रीकर निरीक्षक, तहसीलदार, सहाय्यक विक्रीकर आयुक्त (राज्यात दुसरे) आणि त्यानंतरचा आयएएस (देशात १७६वा.) हा कष्टमय व खडतर प्रवास खऱ्या अर्थाने हे जीवन सुंदर आहे, हे सांगणारा व जीवनातील आव्हाने हसत व निर्धाराने स्वीकारणारा ‘प्रेरणादायी प्रवास’ म्हणता येईल.

घरी अठराविश्व दारिद्र्य, ‘राळेगण म्हसोबा’ या खेडेगावातील आईचे मोलमजुरीचे जगणे, अण्णांचा टेलरिंग व्यवसाय व एकत्र कुटुंब पद्धतीत लेखक वाढला. शिक्षणाच्या, समाजमनाच्या वाटा शोधणाऱ्या ध्येयवेड्या तरुणाचे हे बोलके आत्मकथन स्पर्धापरीक्षेच्या विद्यार्थ्यांकरिता ‘मार्गदर्शक दीपदर्पण’ आहेच; पण समाजमनातील दुर्दम्य आशावाद जागा करणारं हे पुस्तक जिद्द व अनेक सकारात्मक अंगांना स्पर्शून जातं. केवळ राजपत्रित अधिकारी होणं, हेच जीवनाचं ध्येय नाही तर अपयशाने खचून न जाता फिनिक्स पक्ष्याप्रमाणे प्रत्येकाने कशी झेप घ्यावी, हे लेखक सांगतो. यशस्वितेची गरूड भरारी, निर्मल आनंदाची, कार्यकर्तृत्वाची उज्ज्वल वाट ही प्रत्येकाला या पुस्तकातून सापडतेच, हेच या पुस्तकाचे बलस्थान म्हणता येईल.

माझा गाव, माझं घर, चला शाळेत जायचं, माझं हायस्कूल, तयारी दहावीची, आता राळेगणच्या बाहेर, आशा आणि निराशा, आता डी.एड., गुरुजी... बे एके बे, जि. प. प्रा. शाळा, दत्तवाडी, नवी वाट...विक्रीकर निरीक्षक, तहसीलदार रावसाहेब, मिशन जामखेड.. मिशन लाइफ, शेवटचा भीमटोला व आजचा दिवस माझा या एकूण १४ प्रकरणांतून प्राथमिक शिक्षक ते आयएएस अधिकारी हा जीवनप्रवास उलगडत जातो. घरातील व शाळेतील सुसंस्कार, शहरी जीवनातील अभ्यास, स्पर्धा, आव्हानात्मक जग, साधेपणा आणि माणुसकीचा गहिवर आपण पानोपानी ‘आजचा दिवस माझा’ मधून पाहतो. लेखकाचे डॉक्टर होण्याचे स्वप्न परिस्थितीच्या दुष्ट चक्रामुळे पूर्ण होत नाही, बरोबरीचे इतर मित्र डॉक्टर होतात आणि लेखकाला गुणवत्ता असूनही मेडिकलचे आवडीचे क्षेत्र निवडता येत नाही. हे दु:ख सतत पाठशिवणीचा खेळ खेळत असते. घरची जबाबदारी, बहिणीचे लग्न, सतत अडचणींचा डोंगर उभा असतो. दु:खाचे मळभ सरत नसते.

गरिबी, उदासीनता ग्रासलेली  असतानाही, जीवनाची बाग लेखकाने अगदी आनंदाने फुलवली... आई-अण्णांचे, बहीण सुनीताचे, पत्नी निर्मलाचे व मुले कृष्णा व ज्ञानेश्वरीचे प्रेम लेखकाला भरभरून मिळाले. चुलत-मावस भावंडांची साथ, सहकारी शिक्षक, गुरूजन, राजपत्रित अधिकारी, मित्रपरिवार या सर्वांच्या पाठिंब्यामुळे माझे जीवन सुसह्य होत गेले, असे लेखक म्हणतो. त्यामुळे माझ्या आयुष्यातील प्रत्येक यशात माझ्या जिवाभावाच्या लोकांचा वाटा आहे. हे यश माझे  एकट्याचे नाही; तर त्याची झळाळी ही माझ्या दैवतांमुळेच आहे, हे मी कधीही विसरणे शक्य नाही. यांच्यामुळेच मी वर्तमानातली सकारात्मकता शोधू शकलो. म्हणूनच 'आजचा दिवस माझा' हे मी आत्मविश्वासपूर्वक म्हणू शकतो; कारण आजच्या वर्तमानातच उद्याचे उज्ज्वल भविष्य साकारलेले आहे. म्हणूनच भूतकाळातील दुःख उगाळत न बसता वर्तमान हातांतून निसटता कामा नये, हेच लेखकाला या पुस्तकातून सुचवायचे आहे.



प्राथमिक शिक्षक ते थेट शिक्षणाधिकारी...यशाच्या एकेक पायऱ्या सर करत, प्रत्येक दिवसाला नवा आयाम देणारं अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणजे आयएएस विजय अमृता कुलांगे. 'आजचा दिवस माझा' या आत्मकथनातून आयएएस कुलांगे यांचा सचोटी आणि जिद्दीने भरलेला प्रवास वाचकांसमोर येतो. दि. १७ एप्रिल २०२२ रोजी विजय कुलांगे यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसला सदिच्छा भेट दिली.

**नवी संहिता... नवा आशय...**








अंतराळातल्या गूढ जगण्याचा शोध घेत उत्कंठावर्धक कारनामे करणाऱ्या जॉर्ज आणि ॲनीची रंगतदार अवकाशयात्रा...
ल्यूसी आणि स्टीफन हॉकिंग यांच्या अद्भुत कल्पनाशक्तीचा वैज्ञानिक आविष्कार


- **जॉर्ज ॲन्ड द ब्ल्यू मून**
- **जॉर्ज ॲन्ड द शिप ऑफ टाइम**
- **जॉर्ज ॲन्ड द अनब्रेकेबल कोड**

**ल्यूसी आणि स्टीफन हॉकिंग**

अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

**किंमत प्रत्येकी ३९५रु. । पोस्टेज अतिरिक्त**




# आज़ादी

▪

**अरुंधती रॉय**

अनुवाद

**प्रविण अक्कानवरू**

▪

*अधिकारशाही वृद्धिंगत होत असलेल्या या जगात स्वातंत्र्याचा अर्थ चाचपून पाहण्यासाठी आपल्याला उद्युक्त करणारे अरुंधती रॉय यांचे डोळ्यात अंजन घालणारे निबंध*

डोळ्यांत अंजन घालणाऱ्या या निबंधांमधून अरुंधती रॉय अधिकारशाही वृद्धिंगत होत असलेल्या या जगात स्वातंत्र्याचा अर्थ चाचपून पाहण्यासाठी आपल्याला उद्युक्त करतात.

या निबंधांमध्ये सार्वजनिक तसेच खासगी भाषा आणि या अस्वस्थ कालखंडात फिक्शनसह इतर पर्यायी कल्पनांची नेमकी कोणती भूमिका असावी, याविषयीच्या चिंतनाचा समावेश आहे. रॉय म्हणतात, की ही जागतिक साथ म्हणजे दोन जगांच्या दरम्यान असलेले एक प्रवेशद्वार आहे. या साथीमुळे आरोग्याची आणि इतरही अपरिमित हानी झालेली असली, तरी तिने मनुष्यजातीला एक सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. नव्या जगाची कल्पना करण्याचे आपल्या सगळ्यांना मिळालेले हे निमंत्रण आहे.

**नवी संहिता... नवा आशय...**




शगी बेन


**डग्लस स्टुअर्ट**

अनुवाद

**डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके**

एका मुलाचं आपल्या आईप्रति असणारं, हृदयाला पाझर फोडणारं प्रेम मांडणारी मर्मभेदी कादंबरी...

**किंमत : ६३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**



## सुनील मेहता :
## कर्तबगार, स्पष्टवक्ता प्रकाशक

१९९७च्या दरम्यान मी साप्ताहिक सकाळमध्ये ‘जीवन भाष्य’ नावाचं सदर लिहित होते. ते वाचून एक दिवस मेहता पब्लिशिंग हाऊस’ कडून भेटायला येण्यासंदर्भात निरोप आला. त्यावेळी मी आकाशवाणी, वर्तमानपत्र, साप्ताहिक तसेच रंगमंचीय कार्यक्रमदेखील लिहित होते; पण मेहतांकडे कसलेच काम केले नव्हते. मेहतांना प्रत्यक्ष भेटल्यावर त्यांनी ‘The new dawn’ नावाचं इंग्रजीतलं ओशोंचं भलंमोठं पुस्तक हातावर ठेऊन ‘याचा मराठी अनुवाद करायचाय... कराल ना?’ अशी विचारणा केली.

माझं मराठी माध्यमात शिक्षण झाल्यानं अगदी फर्ड इंग्रजी निश्चितच नव्हतं. त्यामुळे एकदम एवढ्या मोठ्या पुस्तकाचा अनुवाद करणं म्हणजे धक्कादायक होतं पण सुनील मेहतांनी पूर्वीचं काम बघून विश्वासानं एक पुस्तक करायला देऊन ‘पुढचीही तीन पुस्तकं करायची आहेत.’ असं सांगितलं.

संपूर्णपणे संभ्रमावस्थेत असताना ‘मी वाचून पाहते आणि कळवते.’ असं म्हणाल्यावर ‘नाही नाही, अनुवादाला सुरुवात करा.’ असे सांगितले. त्यांचा माझ्याबद्दलचा हा प्रचंड आत्मविश्वास पाहून माझा नसलेला आत्मविश्वास मला एका छानशा कामाकडे प्रवृत्त करून गेला.

मी माझं काम सुरु केलं. ओशोंची इंग्रजी भाषा निराळी, बरीचशी काव्यात्म. त्यांच्या

भाषणासारखीच त्यांच्या भाषेलाही लय आहे. माझं काम सुरु झालं.

पहिलं पुस्तक येण्यापूर्वी प्रुफं तपासणीत मोहन वेल्हाळ आणि आमच्यात एका शब्दावरून वाद झाला. त्यांना अपेक्षित असलेला शब्द मला मान्य नव्हता. शेवटी प्रकरण सुनीले मेहतांकडे गेलं. त्यावेळी मी माझं म्हणणं त्यांना पटवून दिलं. सुनील मेहतांना ते इतकं पटलं की, मोहन वेल्हाळ यांच्यासारख्या अनुभवी माणसाला त्यांनी स्पष्ट सांगितलं की, 'प्रज्ञा ओकांचं स्क्रिप्ट त्यांनी लिहिलंय, त्याप्रमाणे छापायला जाऊदे.' माझ्यासाठी तो क्षण फार महत्त्वाचा होता. मी अगदी नवखी असले तरी सुनील मेहतांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला तो फार मोलाचा होता. तिथून पुढे २४ वर्षं मी त्यांच्याकडे अनेक अनुवाद केले. पैश्याच्या बाबतीत अगदी चोख व्यवहार, भारावून जाऊन कौतुक करणं, एक विशिष्ट व्यावसायिक अंतर राखून अत्यंत रीस्पेक्ट देऊन त्यांनी संबंध ठेवले.

व्यंकटेश माडगूळकरांची सर्व पुस्तक त्यांच्याकडे आली. त्याचा प्रकाशन समारंभ त्यांनी मोठ्या प्रमाणात केला. त्यावेळी कामाची बरीचशी जबाबदारी त्यांनी माझ्यावर टाकली होती. संख्येनं माझे अनुवाद कमी झाले. रंगमंचीय कार्यक्रम लिहित असल्यानं अनुवादासाठी वेळ देता येत नव्हता. काही पुस्तकं मी नाकारली. ती का नाकारली तेही त्यांना सांगितलं; पण सुनील मेहतांचा सूर कुठेही विरोधी वाटला नाही.

अनुवादानंतर आता स्वतंत्र पुस्तक लिहावं असं मनात होतं. आणि राजश्री देशमुख या सुनील सरांचा उजवा हात त्यामुळे सुनील मेहतांकडे काही काम असेल तर मला राजश्रीशी आधी बोलणं सोयीचं वाटायचं. अत्यंत स्पष्टवक्ते सुनील मेहता आणि मेहता पब्लिशिंगचा डोलारा शांतपणे सांभाळणाऱ्या राजश्री देशमुख आणि इतर सहकारी असं चित्र फार फार छान होतं.

पण अचानक अघटीत बातमी कानावर आली आणि एक कर्तबगार, थेट बोलणारा सुनील मेहतांसारखा प्रकाशक, माझ्या आयुष्यातला एका निराळ्या वाटेवरून मला नेणारा एक छानसा माणूस असा अचानक लवकर दिसेनासा होईल अशी स्वप्नातही कल्पना केली नव्हती.

सुनील मेहतांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**– प्रज्ञा ओक**

## १६ मे ते १५ जून २०२२ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ मे दरम्यान खास सवलत**

**१७ मे - अंजनी नरवणे यांचा जन्मदिन**
‘आपण आपले ताणतणाव - एक चिंतन’, ‘हितगूज – तणावयुगातील तरुण पिढीशी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १५९/-**

**१९ मे - वासंती घोसपूरकर यांचा जन्मदिन**
‘वादळफूल’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

**२४ मे - राजदीप सरदेसाई यांचा जन्मदिन**
‘डेमोक्रसीज इलेव्हन’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३४९/-**

**२५ मे - गणेश मानुगडे यांचा जन्मदिन**
‘बाजिंद’, ‘धना’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

**२८ मे - इयान फ्लेमिंग यांचा जन्मदिन**
‘फॉम रशिया विथ् लव्ह’, ‘गोल्डफिंगर’ या पुस्तकांचवर विशेष सवलत
**मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २१९/-**

**२९ मे - जागतिक शांतताप्रिय दिवस**
संच १ - ‘मी मलाला’, ‘महात्मा गांधी आणि तीन माकडे’, ‘ममतेची मूर्ती मदर तेरेसा’, ‘मदर तेरेसा’ या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५२९/-**

संच २ - ‘मोहनदास’, ‘दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल’ या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत १०२५/- । सवलत किंमत ६१९/-**

**३१ मे - अहिल्याबाई होळकर यांचा जन्मदिन**
'कर्मयोगिनी', 'सतिसाध्वी देवी अहिल्या' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४४५/- । सवलत किंमत २७९/-**

KARMAYOGINI (English) या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत १७९/-**

**३१ मे - मिलिंद जोशी यांचा जन्मदिन**
'एका परिसाची कथा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

**खालील संचांवर १मे ते १५ जून दरम्यान खास सवलत**

**१ जून - ल. सि. जाधव यांचा जन्मदिन**
'अडगळ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

**१ जून - राजन गवस यांचा जन्मदिन**
'आपण माणसात जमा नाही', 'भंडारभोग-५', 'चौंडकं', 'रिवणावायली मुंगी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७५०/- । सवलत किंमत ५४९/-**

**१ जून - बा. ग. केसकर यांचा जन्मदिन**
'डव्हाळं', 'सुर्वंता'या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**

**१ जून - दादासाहेब मोरे यांचा जन्मदिन**
'गबाळ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**४ जून - आनंद कान्हेरे यांचा जन्मदिन**
'मॅस्वी कान्हेरे' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ९९/-**

**४ जून - जागतिक निष्पाप मुलांचा क्रूर बळी दिवस**

**संच १** - 'हरवलेले बालपण', 'झोंबी', 'खाली जमीन वर आकाश', 'वेस्टेड', 'हिरॉईन ऑफ द डेझर्ट', 'बिलाँगिंग' 'नेव्हर टू रिटर्न', 'ॲन आय फॉर ॲन आय', 'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५८०/- । सवलत किंमत १५९९/-**

**संच २** - 'डिनायल','द डायरी ऑफ मेरी बर्ग', 'वेदनेची फुले', 'मी मलाला', 'आय एम अ टॅक्सी', 'परवाना', 'शौझिया-२', 'द ब्रेडविनर', 'लव्हिंग नॅटली' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७२५/- । सवलत किंमत १०४९/-**

**५ जून - जागतिक पर्यावरण दिवस**

**संच १** - 'वसुंधरा', 'पर्यावरण प्रदूषण', 'वेध पर्यावरणाचा', 'आपली सृष्टी १० पुस्तकांची मालिका', 'वायू प्रदूषण', 'विपुलाच सृष्टी', 'कथारूपी खगोलशास्त्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २३५०/- । सवलत किंमत १४९९/-**

**संच २** - 'केल्याने होत आहे रे', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'विज्ञान नवलाई', 'अंतरिक्षाचा वेध', 'अवनी एक नवी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १३२०/- । सवलत किंमत ८४९/-**

**५ जून - केन फोलेट यांचा जन्मदिन**

'ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

**६ जून - एम. जे. हायलंड यांचा जन्मदिन**

'कॅरी मी डाऊन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

**८ जून - रामचंद्र खाटमोडे यांचा जन्मदिन**

'सर्जा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**९ जून - किरण बेदी यांचा जन्मदिन**
किरण बेदी यांच्या नऊ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २१५५/- । सवलत किंमत १४४९/-**

**११ जून - जॉर्जिना हार्डिंग यांचा जन्मदिन**
'हेरगिरीचा पोरखेळ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

**१२ जून - ॲन फ्रँक यांचा जन्मदिन**
'डायरी ऑफ ॲन फ्रँक' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

**१२ जून - जागतिक बालकामगार विरोधी दिन**
**संच १** - 'हरवलेलं बालपण', 'आय एम अ टॅक्सी', 'खाली जमीन वर आकाश', 'सर्चिंग फॉर डॅडी', 'शेम', 'हिरॉइन ऑफ द डेझर्ट', 'वेदनेची फुले', 'शॅपेल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७१०/- । सवलत किंमत १०४९/-**

**संच २** - 'झोंबी', 'वेस्टेड', 'बिलाँगिंग', 'नेव्हर टू रिटर्न', 'ॲन आय फॉर ॲन आय', 'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १९५०/- । सवलत किंमत ११६९/-**

**१२ जून - भा. द. खेर यांचा जन्मदिन**
'चाणक्य', 'दिग्विजय', 'प्रबुद्ध' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२२०/- । सवलत किंमत ८१९/-**

**१४ जून - जी. डी. मोरे यांचा जन्मदिन**
**A Methodical English Grammar** या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

**१५ जून - अण्णा हजारे यांचा जन्मदिन**
'अण्णा हजारे', 'लढा लोकपालचा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-**

**नवी संहिता... नवा आशय...**




# सांगाती ...स्मरणझुला एका जिप्सीचा

## सदानंद कदम

साहित्यापासून संगीत-नाट्य-कलांपर्यंत, इतिहासापासून गडकोटांपर्यंत अनेक क्षेत्रांतील दिग्गज रणजित देसाई, शिवाजी सावंत, कॅप्टन लक्ष्मी सेहगलांपासून पद्मजा फेणाणींपर्यंत अनेक प्रतिभावंतांचं जिव्हाळपण अनुभवलेल्या आणि ते शब्दबद्ध केलेल्या हरफनमौला सदानंद कदम यांची विलक्षण स्मरणयात्रा..

---

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

---




# ऐसी अक्षरे

## मैत्रेयी जोशी

नियती... मानवी मन... नातेसंबंध... सामाजिक परिस्थिती यांच्या संमिश्र धाग्यांतून विणल्या गेलेल्या स्त्रीकेंद्रित कथा

---

**किंमत : २१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




**'उपरा'** आणि **'किटाळ'** या पुस्तकांच्या सुधारित आवृत्तींच्या प्रकाशनावेळी लेखक श्री. लक्ष्मण माने, 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे व्यवस्थापकीय संचालक श्री. अखिल मेहता आणि इतर मान्यवर



प्रसिद्ध बालसाहित्यिक श्री. एकनाथ आव्हाड यांच्या **'खळाळता अवखळ झरा'** या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ज्येष्ठ कादंबरीकार श्री. विश्वास पाटील, ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कोंकणी लेखक श्री. दामोदर मावजो, 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे व्यवस्थापकीय संचालक श्री. अखिल मेहता आणि इतर मान्यवर

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/05/2022 Posting Date : 11/05/2022

# नवीन संहिता... नवा आशय...




















## मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,